
# गोळ्या काढलेलं पिस्तूल

( दोन अंकी नाटक )

**चं. प्र. देशपांडे**



# गोळ्या काढलेलं पिस्तूल

**( दोन अंकी नाटक )**

**-- चं.प्र.देशपांडे.**

**अंक पहिला**

( नेपथ्य व प्रकाशयोजना आकर्षक असावी. या नाटकातील दृश्यांचे पार्श्वसंगीत चित्रपटतंत्राने. स्वगते व गाणी प्रीरेकॉर्डेड -- मोठ्या आवाजात. नाटकाचा स्पीड शक्य तितका जास्त -- चित्रपटासारखा. एखाद्या चित्रपटाची कथा आपल्याला आवडते -- सुपरहिट ठरते कारण ती आपल्या जगण्याशी जवळीक साधणारी असते. तिच्यातला बनावटपणा जगण्यातही असतो. तिच्या मूलाधारापर्यंत जाऊन, तो पंक्चरही करून पाहणारे हे नाटक. एक बनावट स्टोरी आणि जगणे एकत्रितपणे पाहणारे. नामावली सांगण्यापूर्वीच नायिकेच्या म्हणजे राधाच्या आवाजात ' बचाव-बचाव ' असा ओरडा. मग 'सोड मला - सोड - बचाव - ' असा पुन्हा ओरडा ऐकू येतो. तीनचार गुंडांचे हसण्याचे आवाज. एक गुंड -- 'सोडू काय तुला - सोडू - अं --? ' असे म्हणतो. ' अन्या, सोड रे तिला -- आण इकडं -- ओहो -- काय ताकद दाखवते काय '-- जरा झटापटीचे आवाज. 'आयला चावली साली -- पकड -- पकड -- ' मग राधा --' प्लीऽज, सोडा मला -- सोडा -- वाचवा -- वाचवा -- वाचवा '-- वगैरे. इथे हिरो म्हणजे विजय याची आरोळी -- ' ए ऽऽ...कुत्र्यांनो ऽऽ...' यानंतर जंप मारून आल्याचा आवाज. आता राधाचे ओरडणे नाही. नुसते मारामारीचे आवाज. अर्थात् विजय त्या गुंडांचा समाचार घेत राहतो. हे मारामारीचे आवाज चालू असताना मधूनमधून नामावली. नंतर कुणाला तरी एक ठोसा बसल्यावर तो पाण्यात पडल्याचा आवाज. मग पाण्यातली मारामारी. गुंडांची दमणूक झाल्याचे -- शारीरिक वेदना झाल्याचे आवाज -- जलद श्वासोच्छ्वास वगैरे. मग एकेक गुंड पळून गेल्याचे आवाज. पळून जातानाचे जे एक टिपिकल फास्ट पार्श्वसंगीत असते ते घ्यावे. मग हात झटकून विजय --' पळाले ! ' असे म्हणतो. मग राधाला म्हणतो, ' या आडवाटेला काय करताय आपण --'' माझी गाडी बंद पडलीय --' ती म्हणते. ' बघू - चला ! '-- विजय म्हणतो. जरा खुडबुड केल्याचा आवाज. मग गाडी स्टार्ट होते. ' चला -- मी घरी सोडतो तुम्हाला -- ' विजय म्हणतो. ' चला -- ' ती म्हणते. मग ती म्हणते -- ' तुम्ही इकडे काय करत होता ? ' विजय म्हणतो -- ' मी नोकरीच्या शोधात फिरत होतो-- ' ' इकडे ? ' ती म्हणते. ' देवाची करणी न् नारळात पाणी ! चला ! ' तो म्हणतो. दोघेही हसतात. मग गाडी वेग घेऊन लांब गेल्याचा -- नंतर पुन्हा जवळ येऊन थांबल्याचा आवाज. इथे पडदा उघडतो. राधाचे वडील म्हणजे प्रि. वाघ यांचा बंगला. समोर -- सावित्री -- म्हणजे प्रि. वाघ यांच्या मृत पत्नीचा फोटो. संध्याकाळची वेळ. प्रफुल्लित राधा येते. मागोमाग सावकाशपणे विजय येतो. थोड्या झटापटीच्या खुणा दिसाव्या. )

राधा: डॅडी, डॅडी,... ( म्हणत पुढे येते. जिन्याने वर जाताना मागे वळून विजयला --' बसा हं तुम्ही ' म्हणते आणि जाते. )

विजय: हिचा बाप जर प्रिन्सिपॉल वाघ आहे तर आम्ही आलो तेव्हा तो काहीतरी वाचत बसलेला दिसायला पाहिजे होता. आणि मग पुस्तक खाली ठेवून त्यानं सगळी हकीगत ऐकायला हवी होती. चिरूट ओढत. चिरूट पाहिजेच तोंडात. त्याशिवाय काही खरं नाही. याची स्टडीरूम वर असेल बहुतेक -- त्यामुळं तो तिथं वाचत बसला असेल. पण तो आल्यावर त्याला विचारून घ्यावं की तो वर काय करत होता -- म्हणजे वाचत होता की नव्हता. अर्थात हे सगळं मी हीरोच्या मनातलं बोलतोय. ॲक्टर म्हणून म्हटलं तर मला सगळंच माहीत आहे. संपूर्ण कथा-पटकथा-संवाद हे फक्त मलाच, आधी वाचायला मिळतात. त्यामुळं पिक्चरमधे माझं स्थान नीट मजबूत आहे की नाही हे मी आधीच पाहून घेतलेलं असतं. ( राधा आणि तिचे वडील येतात. त्यांच्या हातात खुणेसाठी बोट ठेवलेले पुस्तक आणि तोंडात चिरूट. )

राधा: हेच ते ! विजय सरनाईक !

विजय: माझ्या अपेक्षेप्रमाणे सगळं आहे, त्यामुळं मी आता काही विचारायचं कामच नाही.

वाघ: काय म्हणालात ?

विजय: छान !

वाघ: छान, छान ! तुमचे आभार मानायला माझ्याकडे शब्दच नाहीत.

विजय: नाही, नाही, तसं काही नाही, माझं कर्तव्यच होतं ते !

वाघ: चौघांशी टक्कर दिलीत तुम्ही ! राधानं सांगितलं मला ! तुम्ही हा जो धोका पत्करलात त्याचं ऋण कायम राहील आमच्यावर !

विजय: तुमच्या हातात जे पुस्तक आहे ते बहुतेक मादक द्रव्यांचे दुष्परिणाम आणि तरुण पिढी या विळख्यातून सोडवायची कशी वगैरे बद्दलचं आहे का ? ( थोडे पार्श्वसंगीत. )

वाघ: कमाल आहे ! त्याबद्दलच आहे ! तुम्ही वाचलंय हे ?

विजय: नाही, एक अंदाज ! तुम्ही या विषयावर भाषणंसुध्दा देत असाल !

वाघ: कमाल आहे ! देतोच । उद्याच माझं भाषण आहे या विषयावर ! अवश्य या तुम्ही !

विजय: ( स्वत:शी -- ) म्हणजे हा भडवा नक्की मादक द्रव्यांचा स्मगलर असणार.

राधा: कसला विचार करताय, याल ना भाषणाला ?

विजय: नाही, हो, हो, येईन ना !

राधा: डॅडी, हे ऑटोमोबाईल इंजिनियर आहेत. एक मिनिटात त्यांनी माझी गाडी स्टार्ट केली. नोकरीच्या शोधात आहेत.

वाघ: चार जणांशी लढणारा शूर इंजिनियर ! माझ्या एका मित्राची जवळच फॅक्टरी आहे, त्याच्याकडे मी शब्द टाकीन.

विजय: मला ड्रायव्हिंग चांगलं येतं ! माल पोचवायचा आणि पैशांची ब्रीफकेस आणायची हे करू शकेन मी !

वाघ: छे, छे. इंजिनियर आहात तुम्ही !

विजय: तरी ड्रायव्हिंग चांगलं लागेलच ना ! मी तेच तेच रोल करतो एवढंच नाही तर विजय हे नाव सक्सेसफुल झालं म्हणून नावही तेच ! आणि हिचं नाव राधा का तर त्यामुळं नकळत मला किशन कन्हैयाचं मीनिंग येतं ! दुर्योधनानं सगळं सैन्य मागितलं पण अर्जुनानं फक्त कृष्ण मागितला. कृष्ण हजारोंना भारी पडू शकतो. म्हणून ही राधा. पण मी विजयच ।

वाघ: फार मजेदार बोलता तुम्ही ! एखाद्या पिक्चरचे हिरो वगैरे असल्यासारखे वाटता !

विजय: मलाही तसंच वाटतं ! ( स्वगत -- ) हा जर हिचा खरोखरचा बाप नसेल तर माझ्या हातनं मरणार आहे शेवटी ! पण स्टोरीप्रमाणे हाच हिचा बाप असेल तर मी त्याला मारणं बरं दिसणार नाही.

वाघ: पण एवढ्याजणांशी कशी काय लढत दिलीत तुम्ही ?

विजय: मी तुम्हाला याचं रहस्य सांगतो. मारामारी ही दिसायला शारीरिक दिसते पण असते ती मानसिक. मनानं जर आपण वरचढ राहिलो तर जिंकतोच आपण. त्यामुळं एकानं चौघांना किंवा दहांना लोळवणं खोटं नसतं.

राधा: ( पसारा आवरत -- ) आणि हे मी प्रत्यक्ष पाहिलंय डॅडी !

वाघ: पण मी कुठं काय म्हणतोय !

विजय: मला तुमचं एक आश्चर्य वाटतं ! प्रिन्सिपॉल म्हणून काम करता -- हेच मुळात कित्येक तास खाणारं काम आहे ! आणि शिवाय एवढा मोठा धंदा -- त्यातली माणसं वगैरे -- हे सगळं कसं काय सांभाळता तुम्ही ? हे बाकीचं सगळं रात्री चालतं का ? झोपता कधी मग ?

वाघ: काय, कुठला धंदा ? काही वडिलोपार्जित मालमत्ता आहे झालं !

विजय: आणि पुढंपुढं काही प्रसंग असे येतील की ते रात्रीचे नसतील -- तेव्हा मग काय कॉलेज वाऱ्यावर सोडून देणार का काय ? आणि तुम्हाला या लाईनला जर इतकं इंटरेस्ट आहे तर तुम्ही प्रिन्सिपॉल झालातच कसे ? आणि एवढा मोठा धंदा तुम्ही कधी उभा केलात ? अगदी एवढे मोठे बॉस होऊन इंटरनॅशनल काँटॅक्टस् वाढवण्यापर्यंत ?

राधा: दुसरा कसला धंदा ?

विजय: ( राधाला -- ) तुम्हाला ते माहीत असावं अशी अपेक्षा नाही.

वाघ: अहो प्रिन्सिपॉलपदाच्या जबाबदाऱ्या सांभाळून दुसरा कुठला धंदा कसा जमेल !

विजय: तेच तर विचारतोय मी ! आणि तसं जर नसेल तर या संपत्तीची ही एकमेव वारस असल्यामुळं प्रॉब्लेम येणार ! आणि तुम्हाला एक बॉस म्हटल्यामुळं हुरळून जाऊ नका. कारण ॲक्टर कोण आहे हे बघितल्यावर तुम्ही काही मेन बॉस असणं शक्य नाही, पण एक दुय्यम, साहाय्यक बॉस असू शकता !

राधा: डॅडी, सॉरी ! यांनी मला त्या संकटातून वाचवलं म्हणून कृतज्ञतेमुळं मी यांना घरी आणलं, पण यांच्यात काहीतरी मानसिक दोष असावा असं वाटतंय मला.

वाघ: छे, छे ! असं बोलू नये ! तर श्रीयुत विजय सरनाईक हिचं बोलणं मनावर घेऊ नका. पण तुम्हीही एखाद्या पिक्चरमधलं पात्र असल्यासारखं करू नका.

विजय: ( प्रिरेकॉर्डेड मोठ्या आवाजात -- ) हे पहा वाघसाहेब, आपापल्या मनाच्या सवयीप्रमाणेच प्रत्येकजण जगतो. माझ्या अनुभवावरून मला काही अंदाज येणारच. त्याला मी काय करणार ? मी करत असलेल्या रोलची सायकॉलॉजी मी शोधणारच नं !

वाघ: म्हणजे, तुम्ही ज्याअर्थी राधाला गुंडांच्या संकटातून सोडवलं त्याअर्थी माझा मादक द्रव्यांच्या स्मगलिंगचा धंदा असेल असं तुमचं म्हणणं !

विजय: तसं नसेल तर ही संपत्तीची एकमेव वारस असल्यामुळं हिच्याशी कंपलसरी लग्न करण्याचा विचारात कुणीतरी असणार. की दुसरा कुणी आहे वारस ?

वाघ: आणि हेही सगळं काही नसेल तर ?

राधा: हं, हे काहीच नसेल तर ?

( विजय सीनच्या बाहेर -- पुढे येतो. मागे पांढरा पडदा पडत जातो. हा पडदा जरा ऑफव्हाईट – डोळ्यांना त्रास होणार नाही असा असावा )

विजय: हे काहीच नसेल तर ? ( खिशातून सिगरेट पाकीट काढून एक सिगरेट तोंडात धरतो. पाकीट ठेवून

काडेपेटी काढतो. काडी ओढतो. फर्रर्रर्र -- असा मॅग्निफाईड आवाज... इथून पुढे रेकॉर्डेड -- मोठ्या आवाजात -- ) हे काहीच नसेल तर ?! हिंदी पिक्चर देखनेवाला छोटा-बडा बच्चा बच्चा जानता है की याचा अर्थ, हा निव्वळ एक साधा, तत्त्वशील, सज्जन माणूस आहे ! म्हणजे एक तर याचा खून होणार किंवा याच्यावर कसलातरी खोटा आरोप आणून त्याला जेलमध्ये रवाना केलं जाणार. अशा माणसाचा दुसरा उपयोग तरी काय ? त्याच्यामुळं स्टोरी पुढं सरकते हेच महत्त्वाचं ! ( आता नेहमीच्या आवाजात -- ) -- हे असं सगळं ठरलेलं असल्यामुळं फार प्रॉब्लेम होतात. परवा मुलाखतीत एक दिग्दर्शक सांगत होता की पुढचा सीन काय असेल हे प्रेक्षक आधीच ओळखतात -- त्यामुळं शक्यतो नवीन काहीतरी करत राहावं लागतं. माणसं, वस्तू, वातावरण -- हे तरी नवीन घ्यावं लागतं. नाही तरी दुसरे कसले बदल शक्य आहेत ? असो. -- तर प्रिन्सिपॉलसाहेबांनी त्यांच्या मित्राकडे शब्द टाकला आणि मला तिथे नोकरी लागली. हे ठीक झालं. तर त्या मित्राचा मुलगा रमण हा मादक द्रव्यांचं सेवन करणारा होता. म्हणजे अधीनच गेलेला होता. आता त्याला यातून बाहेर काढण्याची अवघड कामगिरी अंगावर घेणं, त्यासाठी थोडाफार धोका पत्करणं -- हे अर्थातच आलंच. स्टोरीरायटर म्हणाला की मुलाऐवजी ती मुलगीही दाखवता आली असती पण पुढं हीरो दोन मुलींच्या संपर्कात येतोच आहे तर मग ही तिसरी घेऊन काय साध्य होणार ? शिवाय मुलगा घेतल्यामुळं, व्यसनातून बाहेर येऊन तो हीरोचा मित्र होऊ शकतो आणि पुढं व्हिलनविरुध्दच्या कामगिरीत त्याची हिरोला साथही लाभू शकते. हे अर्थात् बरोबरच होतं. शिवाय हा कार्यभाग -- म्हणजे व्यसनातून सोडवण्याचा -- नायिकेच्या म्हणजे राधाच्या समोर घडत असल्यामुळं तिच्या मनात योग्य ते तरल परिवर्तन घडवत जाता आलं. एक गाणंही घेता आलं. गाण्याच्या बाबतीत आमच्या दिग्दर्शकाची एक नावीन्यपर्ण अट होती ती अशी की ' जिंदगी ' किंवा ' जीवन ' तसंच 'दुनिया ' किंवा 'जहाँ 'हे शब्द गाण्यात येता कामा नयेत. विशेषत: ' जिंदगी ' आणि ' दुनिया ' हे शब्द संवादांत आले तरी तो खवळतो. या शब्दांचा वापर नाही असा पिक्चरच सापडणार नाही असं त्याचं म्हणणं. या मोठेपणाच्या बंडलबाजीची काही गरज नसते असं त्याचं म्हणणं. आणखी एका गोष्टीची त्याला अशीच चीड आहे. ती म्हणजे हीरोनं हिरॉईनचं कौतुक किंवा लाड करण्याचा एकच सर्वमान्य मार्ग ! हजारो पिक्चर्समधून हे घडत आलेलं आहे ! काय तर हीरोनं आपल्या डोक्यावरची टोपी किंवा हॅट हिरॉईनच्या डोक्यावर घालणं ! आमच्या दिग्दर्शकाचं म्हणणं असं की लाड करायचे दुसरे काही प्रकार काढा नं -- तोच तोच बावळटपणा किती वर्षं करणार ! असो ! तर गाणं --

( राधा येते. )

ती: एक डहाळी खुद्कन् हलली नकळत झुळूक येता

स्त्रीकोरस : नकळत झुळूक येता

तो: मनात माझ्या खूण उमलता साद फुले आतुरता

पुरुषकोरस: साद फुले आतुरता

ती: मनात माझ्या मोहर फुलले
तुझ्या दृष्टीने मी मज प्याले
माझी हळवी आणिक धूसर अगम्य मृद्गंधता

स्त्रीकोरस: नकळत झुळूक येता

तो: तुझे बहाणे मी परतविले
आक्रमणाने तुला वेढिले

तू विजयी अन् पराभूत मी आनंदाने होता

पुरूषकोरस: साद फुले आतुरता

ती: एक डहाळी ...

तो: मनात माझ्या... ( दोघेही समोरासमोर. काही क्षणांनी विजय पुढे येतो, राधा जाते... )

विजय: नायक आणि नायिकेनं. एकासएक या पध्दतीनं गरीबपणानं गाणी म्हणण्याचे दिवस आता राहिलेले नाहीत. पण हे इतके स्त्रीपुरुष -- या आत्ताच्या गाण्यातले -- मधेच कुठून आले ? हे कुणी विचारण्याचा प्रश्नच नसतो. दृश्य प्रचंड करून घेतलं, आवाज प्रचंड करून घेतला तसंच नायक आणि नायिका अनेकांत वाढवून घेण्याचा हा प्रकार असतो -- हे सगळ्यांना समजतं. हा एकूणच प्रचंडपणा अनुभवायला थिएटरमध्येच जावं लागणार हे नक्की ! तर अशा पध्दतीनं आमचं प्रेम बहरत चाललं. सुरुवातीला हे सगळं बरं असतं. म्हणजे मग जरा उशिरा आलेल्या प्रेक्षकांनासुध्दा आपलं फार काही बघायचं चुकलं असं वाटत नाही. इकडं रमणला -- म्हणजे तोच वाघांच्या मित्राचा मुलगा -- व्यसनातून सोडवणं चालूच होतं. आणि संध्याकाळी राधाला भेटणं. एकदा हॉटेलात चहा पिऊन आम्ही बाहेर पडल्यानंतर तर फारच भारी गाणं घेतलं. रस्ते, चौक, पूल वगैरे ठिकाणी भरपूर गर्दी असूनही आम्ही यातून प्रचंड गाणं म्हणत जातो असं जरा वेगळंच घेतलं -- (राधा सुसाट येते --)

फावल्या वेळात हसू नाचू धुंद होऊन घेऊ
चहा पिऊन तर्रर होऊन गाणे गाऊन घेऊ
उरलेल्या संध्याकाळी
उरलेला सूर्य
तुझ्यामाझ्या मनी होते
तेवढ्यात चौर्य
बुडताना सूर्य आता फ्लॅश मारुन घेऊ
जाताजाता जरा थांबू
वळणाशी जरा
हाती हात टच करून
मिळवू नजरा
दिसेनासे होता होता पुन्हा पाहून घेऊ...
पुन्हा पाहून घेऊ ... ( राधा जाते. )

आणि मग शेवटी ही वेळ आली. आमचं प्रेम जाहीर करायचं आम्ही ठरवलं. माझ्या आईला थोडंफार माहीत होतं. राधा एकदा घरीही आली होती. आईला ती फारच आवडली होती. प्रि. वाघ उर्फ डॅडी यांना सांगायला मी जायचं ठरलं. मी भेटायला येणार असल्याचं राधानं त्यांना आधी सांगायचं वगैरे ठरलं. त्याप्रमाणे मी घरी गेलो. राधा घरी होती पण डॅडी नव्हते. राधा जरा विचारातच होती. एवढ्यात मी गेलो. ( पांढरा पडदा वर जातो. आता विजय घरात आलेला आहे. )

विजय: डॅडी काय वर वाचत बसलेत का ?

राधा: नाही. तू येणार असल्याचं मी त्यांना सांगितलं होतं, त्यांना दुसरं काही कामही नव्हतं, पण त्यांना दोन फोन येऊन गेले आणि ' मी आलोच - अर्ध्यापाऊण तासात ' असं म्हणून ते बाहेर गेले. काहीतरी अर्जंट काम निघालं असावंसं दिसतं.

विज: निघणारच.

राधा: का ? असं का ?

विजय: ते आज ना उद्या एखाद्या संकटात सापडत जाणार याची मला कल्पना होतीच.

राधा: का ? असं का ? ( थोडे पार्श्वसंगीत. )

विजय: कारण चांगल्या, सज्जन आणि तत्त्वशील माणसाचा, स्टोरीत दुसरा काही उपयोग नसतो. अशा माणसाचा खूनबीन झाला तर पब्लिकलाही बऱ्यापैकी राग येतो.

राधा: खून ? नको, नको.

विजय: स्टोरी ठरवताना तुझा सल्ला कोण घेणाराय ?

राधा: नाही नाही, असं होता कामा नये.

विजय: हे बघ राधा, तू प्रॉब्लेम लक्षात घे. ते नुसते सरळ, सज्जन, तत्त्वशील आणि सत्याचे पुजारी आहेत. प्रामाणिकपणा,नि:स्वार्थीपणा आणि त्यागीपणा हे गुण असणारे काही लोक असून ते चांगले आणि याच्या उलट असलेले वाईट असं ते स्टोरी रायटर समजतात. चांगले आणि वाईट यांच्यात झगडा चालतो असं ते मानतात. स्टोरीसाठी असे समज आवश्यकही असतात.

राधा: मग ?

विजय: पण खरंच अशी दोन प्रकारची असतात का माणसं ? समजा स्वत:च्या मुलीवर संकट येऊ नये या हेतूनं ते स्वत: जरी खोटं बोलले तरी त्यांचीच बाजू सत्याची राहते !

राधा: काय चूक आहे मग याच्यात ?

विजय: चूक म्हटलं तर स्टोरी खलासच होते. तिला चूक न म्हणता सत्यच म्हणायचे असते. त्यामुळं, ’ सत्यमेव जयते ’ हे त्यांचं तत्त्वं, त्यांच्यानंतर म्हणजे त्यांच्या मागं खरं करायची जबाबदारी आपली असते. वाईट माणसांवर चांगल्या माणसांचा विजय हा झालाच पाहिजे आणि त्यासाठी आवश्यक ते सगळं घडलंच पाहिजे.

राधा: म्हणजे ?

विजय: म्हणजे उदाहरणार्थ कायदा पाळणारी ती चांगली माणसं. न पाळणारी वाईट. पण त्यातही सविनय कायदेभंग करणारी चांगली. आपल्या देशासाठी खोटं बोलणारी चांगली. गरिबांसाठी दरोडे घालणारी चांगली. थोडक्यात म्हणजे बाहेर एखादा माणूस काय करताना दिसतो याला महत्त्व नाही. तो आपल्याला कसा वाटतो याला महत्त्व आहे.

राधा: म्हणजे डॅडी चांगले आहेत.

विजय: अर्थातच ! फक्त एकच असतं -- नुसतं असं चांगलं जगत राहता येत नाही. निरनिराळ्या प्रसंगांवर घासून तुमचा कस तपासला जाणारच. आव्हान हे येणारच ! आव्हानच आलं नाही तर त्या चांगलेपणाचं करायचं काय ! त्यामुळं आव्हान हे आलंच पाहिजे ! जगाचा नियमच आहे हा !

राधा: डॅडी जरा करारी आहेत पण चांगले आहेत ! उगीचच कोण कशाला त्यांचा खून करेल !

विजय: वाईटाच्या आड येऊ शकतात नं ते !

राधा: कुणाच्या अध्यात ना मध्यात असे आहेत ते !

विजय: चांगला माणूस असा असू शकत नाही हाच तर प्रॉब्लेम आहे ना ! ( बेल वाजते. राधा जाऊन दार उघडते. प्रि वाघ येतात. उव्दिग्न. बसतात. )

राधा: काय झालं डॅडी ?

वाघ: ( विजयला -- ) सॉरी हं ! हें मधेच नवीनच उपटलं एक !

राधा: काय झालं ?

| | |
|---|---|
| वाघ: | पोलीस चौकीत जाऊन यावं लागलं. पोलिसांचा फोन यायच्या आधी एक धमकीचा फोन आला होता. म्हणे, पोलिसांनी चौकीवर बोलावलं तरी जाऊ नका. गेलात तर परिणाम वाईट होईल. नंतर चौकीचा फोन आला. पण मी जायचं ठरवलं. धमकी देतायत ! |
| विजय: | काय, प्रकार काय झाला पण ? |
| वाघ: | कॉलेजच्या हॉस्टेलच्या एका खोलीत विक्रीसाठी ठेवलेलं गर्द सापडलं. हॉस्टेलवरचे दोन विद्यार्थी आणि इतर दोन विद्यार्थी यांना पोलीसांनी पकडलं होतं. आमचे रेक्टरही तिथं होते. त्यांनीच मला बोलावून घ्यायला सांगितलं होतं. |
| राधा: | मग काय झालं ? |
| वाघ: | मी म्हटलं, यांना दयामाया नाही. योग्य ती ॲक्शन घ्या. मी चौघांचीही नावं आणली आहेत. उद्या त्यांना रस्टिकेट करून टाकतो. त्यांतला एकजण, प्रसिध्द नेते अण्णासाहेब मोहिते यांचा मुलगा आहे. राकेश मोहिते. ( जोरात पार्श्वसंगीत सुरू होते. राधा धीर खचत चालल्याप्रमाणे त्यांच्याजवळ येऊन उभी राहते. ) |
| राधा: | ( जवळजवळ रडू फुटत -- ) नको डॅडी. हे सगळं इथंच थांबवू. आता काहीच घडायला नको पुढं. |
| विजय: | जगणंच थांबवायचं ? |
| राधा: | मग आता काय घडेल ? |
| विजय: | लगेच नाही. ही सुरुवात आहे. खोटं असलं तरी बरोब्बर कसं सगळं टोकावर येतं ते पाहात राहा. आणि आपल्याला यातून जावंच लागणार कारण तशी स्टोरीची डिमांड आहे. आणि त्यात फारसं वाईट वाटायचा प्रश्न येत नाही. कारण ही नुसती स्टोरी असते. तुमचं दु:ख थोडक्यात येईल -- असं असं झालं, त्याचं तुम्हाला दु:ख झालं -- बस्स् ! कारण असं असं घडलं तर संबंधितांना दु:ख झाल्याचं दिसलं पाहिजे ! त्याच्याशिवाय स्टोरी कशी घडेल ! |
| राधा: | ( रडतच -- ) समज घडली स्टोरी -- तर काय ? |
| विजय: | काही नाही. तीच स्टोरी -- म्हणजेच गोष्ट -- सांगायची. घटनांच्या साखळीत माणसाला इंटरेस्ट असतंच ! शेवट गोड करता येतो ! आणि करावाच गोड ! काय हरकत आहे ! प्रेम, कर्तव्य, मरणाचा धोका आणि दुष्टांचा नि:पात यांची बॅलन्स्ड् भट्टी जमली की मजा येते. आपल्याला जे चांगलं म्हणून माहीत आहे तेच यशस्वी झालेलं दिसलं म्हणजे झालं ! हे सगळं घडणार असलं तरी मधले प्रसंगही खरे वाटत राहिले पाहिजेत. हे -- आत्तासारखे ! |
| राधा: | नको, नको, डॅडी, द्या सोडून सगळं ! |
| वाघ: | नाही, नाही, यात मी कसलीही तडजोड करणार नाही. |
| राधा: | डॅडी, खरंच, तुम्ही असं जिवंत असलेलंच मला बरं वाटतंय -- |
| वाघ: | तो प्रश्नच नाही ! बरोबरच आहे ! बरं, अण्णासाहेबांची न् माझी एकदा ओळख झाली होती. त्यांचा मुलगा राकेश यात असल्याचं त्यांना सांगायला हवं -- त्यांना फोन करतो -- ( उठतात. ) |
| विजय: | थांबा, फोन करायचा प्रश्नच येणार नाही. इथं एंट्रीच आहे त्यांची -- ( ते येतात. राधा आत जाते. ) |
| मोहिते: | फोन कशाला करता ? मी हजर आहे ! राकेश माझा मुलगा ! बोला. |
| वाघ: | तोच. तोच रिंगमास्टर -- आपलं रिंगलीडर आहे या टोळक्याचा. तुमचं तुमच्या मुलाकडे लक्ष नाही. |
| मोहिते: | हे जरा चुकतंय तुमचं. लक्ष आहे. |
| वाघ: | आणि तरीही तुम्हाला हे माहिती नाही की मादक द्रव्यांच्या लफड्यात तो आहे. पोलिसांनी त्याला पकडलेलं आहे. उद्या या प्रकरणात मी चार मुलांना रस्टिकेट करतोय, त्यांत तो आहे. |

मोहिते: सगळं मला माहिती आहे. पण तरीही तुम्ही बोलताय ते मात्र चुकीचं आहे. तुम्ही कुणालाही रस्टिकेट करणार नाही आहात.

वाघ: का नाही ? जरूर करणार आहे.

मोहिते: तुम्ही बोलताय ते सगळं खोटं असून ?

वाघ: खोटं ?

मोहिते: लावा ना फोन पोलीस स्टेशनला. विचारा, असं काही घडलंय का -- ( पार्श्वसंगीत सुरू. )

वाघ: म्हणजे तुम्ही -- ( जाऊन फोन लावतात. फोनवर -- ) तुम्ही आमच्या कॉलेजच्या हॉस्टेलवरून जी मादक द्रव्यं -- मी प्रिन्सिपॉल वाघ बोलतोय -- तर जी मादक द्रव्यं जप्त केलीत आणि त्यात जी मुलं -- काय ? असं काही घडलेलंच नाही ? मी कॉलेजचा प्रिन्सिपॉल आहे एका. आमचे रेक्टरही साक्षीदार आहेत. आम्ही हे चालू देणार नाही. ( फोन ठेवतात. ) तुम्ही, याचा अर्थ, तुमचं वजन वापरलंय. हे तुमचं असं वागणं जनतेला धोकादायक आहे. मी हे उघडं पाडीन.

मोहिते: तुम्ही सुशिक्षित असलात तरी वेड्यासारखं बरळताय, असं म्हणायला लोकांना संधी देऊ नका. राज्यशासनाला कायदा आणि सुव्यवस्थेकडं लक्ष द्यावंच लागेल. निरपराध लोकांच्या विरुध्द तुमच्यासारखे सुशिक्षित लोक कुभांड रचायला लागले तर शासन बघ्याची भूमिका घेणार नाही. आपली मुलं, जनता विश्वासानं तुमच्या हातात सोपवते.

वाघ: म्हणजे तुम्ही तुमच्या मुलाला असं बेकायदेशीर वागायला प्रोत्साहन देऊ इच्छिता ! जनतेचं नेतृत्व करता आणि जनतेच्याच नरडीचा घोट घ्यायची यंत्रणा वाढवता.

मोहिते: तसं तर मग मीही असं वाचलंय की स्वत:साठी किंवा दुसऱ्यासाठी दु:ख तयार करणं -- असं वागणं -- जगणं -- म्हणजे वाईट जगणं ! उदाहरणार्थ आपल्या सगळ्यांच्याच जगण्याच्या पध्दतीतून दंगली होतात, मोठमोठी युध्दं होतात, प्रचंड हिंसा घडते -- याचा अर्थ आपण सगळेच वाईट आहोत ! जवळचं कुणी माणूस मेलं म्हणजे आपल्याला दु:ख होतं -- याचा अर्थच आपली जगण्याची पध्दत वाईट आहे ! या सगळ्यातलं आता अधिक वाईट आणि कमी वाईट असं मोजायच्या फुटपट्ट्या आहेतच कुठे कुणाकडे ! संतवाङ्मय वगैरे वाचता की नाही कधी ?

विजय: थांबा ! हे असं चालणार नाही ! चांगलं आणि वाईट दोन्हीही संशयास्पद केलं तर गोष्ट तयारच होणार नाही. अण्णासाहेब, तुम्ही वाईट आहात हे ठरलेलं आहे, त्याला धरून, तेवढंच बोलावं लागेल तुम्हाला !

मोहिते: मला एवढंच म्हणायचं होतं की तुम्ही जसं तुमच्या वाईट जगण्याची भरपाई म्हणून काही समाजकार्य करता तसंच आमचं आहे. ज्यांना मरायचं आहे त्यांच्यासाठी आम्ही मादक द्रव्यांचा व्यापार करतो, ज्यांना जगायचं आहे त्यांच्यासाठी इस्पितळं बांधतो, ज्यांना धर्म करत जगायचं आहे त्यांच्यासाठी मंदिरं बांधतो, शिवाय आम्ही सोडून इतरांमध्ये कायदा आणि सुव्यवस्था राहावी असा प्रयत्न करतो ! तुमचंही थोडंफार असंच असतं ! आणि गोष्टीचं म्हणाल तर हा सीन, मी आणि प्रिन्सिपॉलसाहेब या दोघांच्यातच व्हायला हवा होता. ( विजयकडे बोट -- ) हे इथं कशाला थांबलेत ? नीट ठरल्याप्रमाणे गोष्ट जायला हवी असेल तर एंट्रीज-एक्झिट्स् ठरलेल्या पाहिजेत.

विजय: प्रत्यक्ष जगण्यात असं काही घडत नाही.

मोहिते: काय घडतं मग ? तुम्ही हीरो आहात या पिक्चरचे, पण चुकताय ! सगळे लोक गोष्ट लेव्हलवर जगल्यामुळंच तर घोळ आहे ! असं झालं म्हणून सुख झालं, असं झालं म्हणून दु:ख झालं, असं झालं म्हणून चीड आली, असं झालं म्हणून सूड घेतला -- ही सगळी गोष्ट लेव्हल ! का दुसरं काय जगतोय

कोण ? हीरोचा भाऊ मेला तर त्याला दु:खच व्हायला पाहिजे ! तो खुनानं मेला तर हीरोनं त्याचा सूड घेतला पाहिजे ! म्हणूनच कुठलंही पिक्चर बघा. मी नुसता वाईट आहे म्हणून तुम्ही म्हणजे हीरो माझ्याशी लढत नाही. जोडीला तुमच्या बहिणीवर बलात्कार, भावाचा खून, तुमच्या वडिलांवर खोटा आरोप आणून त्यांना जेलमध्ये पाठवणे -- असं काहीतरी लागतं ! तुमच्या वैयक्तिक सुखावर घाला घातला गेला पाहिजे ! तरच गोष्टीला धार येते. तुम्ही ज्यांना चांगले लोक म्हणता ते उगीचच संतापत नाहीत, त्यांच्या जगण्याला कुठंतरी भोक पडलं तरच ते खवळून उठतात. आणि लोकांनाही हेच पटतं. तरीही लोक त्यांना चांगले म्हणतात.

विजय: चांगलं काय, वाईट काय हे ठरलेलंच पाहिजे.

मोहिते: विजयजी, तुम्ही मला सांगा, तुम्ही अशाही एका पिक्चरमध्ये हीरो होता की नाही की ज्यात तुम्ही स्वत: स्मगलर होता ? तिथं मात्र तुमचं दरिद्री बालपण, एक पेरू चोरल्यामुळं तुम्हाला खावा लागलेला मार वगैरे दाखवून तुमच्याबद्दल सहानुभूती तयार केली गेली होती ! शेवटी, याही पिक्चरमध्ये तुमचा न् माझा धुवांधार संघर्ष होणार आहेच. पण उगीच बिनडोकसारखं बडबडू नका.

विजय: माझं नाव अनिलकुमार आहे, विजयजी नव्हे.

मोहिते: मग मीही विष्णुपंत देऊळगावकर आहे, अण्णासाहेब मोहिते नव्हे.

वाघ: हे असले घोटाळे इथं करू नका. इथं ॲक्चुअल पैसे घालावे लागतात. फुकटात तयार होत नाही पिक्चर. पैसे वसूल होऊन शिवाय नफा झाला पाहिजे. गोंधळ नको.

विजय: प्रेक्षकांना आपले पैसे वसूल झाले असं वाटलं तरच हे जमेल. त्यामुळं तुम्हीच तुमची बिनडोक बडबड थांबवा आणि स्टोरी पुढं सरकू द्या.

मोहिते: मग ठीक आहे. हा सीन संपला. ( जाताना एक भुवई चढवून चेहऱ्यावर दुष्ट भाव आणतात. ) मीही माझ्या अभिनयाचे पैसे घेणार आहेच ! ( जातात. )

विजय: आता स्पीड पकडायला पाहिजे ! स्टोरी !

वाघ: बरोबर आहे.

राधा: ( प्रवेशून -- ) काय झालं ? काय म्हणत होते ते ?

विजय: आता ते सगळं इथं पुन्हा नको. सीन कट.

राधा: थांब, थांब, एक मिनिट ! हे एक राह्यलंय -- इकडे ये -- ( ती त्याला सावित्रीच्या फोटोसमोर आणते. सौम्य पार्श्वसंगीत -- ) ही माझी आई ! प्रेमळ होती. अजूनही डॅडी तिच्या आठवणीत कधीकधी सुन्न बसून राहतात --

विजय: ( फोटोला नमस्कार करतो. ) हा तुझ्या आईचा फोटा असणार हे मी ओळखलेलं होतंच म्हणा ! खरं तर हा सीन आधी कुठंतरी घ्यायला हवा होता ! पण मला एक सांग, ते जेव्हा सुन्न बसून असतात तेव्हा ते कुठल्या आठवणी काढतायत हे तुला कसं कळतं ?

राधा: दुसऱ्या कुठल्या काढणार रे ? ( इथे जोरात म्युझिक वाजते आणि वाघ उठून दुसऱ्या बाजूला जाऊन उभे राहतात -- )

विजय: ते आहे म्हणा ! बरं मी निघतो. ( वाघना --) बरंय -- निघतो मी --

वाघ: बरं, बरं, या !

विजय: ( स्वत:शी -- ) मी राधाला मागणी घालायचा सीन होऊन गेला असता तर आणखी एखादं गाणंही घेता आलं असतं ! पण स्टोरी थांबवून ठेवायची लिमिट संपली असावी ! ( जातो. वाघ हळूहळू पुन्हा येऊन बसतात. सुन्न होत जातात--.)

राधा: डॅडी, तुम्हाला मम्मीची आठवण येतीय का ?

वाघ: ( पार्श्वसंगीत सुरू. ) होय बेटा होय ! खरं तर माझी एक चूक झाली होती. नेहमीच मी त्याबद्दल विचार करत असे. पण तिला मी ते कधीच सांगितलं नाही. या अज्ञानातच आयुष्यभर प्रेम केलं तिनं माझ्यावर ! तिला मनातलं हे बोलावं की बोलू नये यावरच कित्येक वर्षं नुसताच विचार केला मी ! शेवटी ती कॅन्सरनं वारली तरी माझा विचार संपलाच नाही. माझ्या या स्वभावाचा मला अनेकदा पश्चात्ताप होतो -- पण स्वभाव बदलत नाही. पुन्हा पुढे असंच काहीतरी घडतं. मी नक्की निर्णय घेऊन कृती करायची गरज असते आणि काळ नुसताच जात राहतो.

राधा: पण तुम्ही हा दोष मान्य करता -- तुम्हाला पश्चात्ताप होतो -- म्हणजे कुणाच्याही सहानुभूतीलाच तुम्ही पात्र ठराल -- हे तर झालंच, पण माझ्या तर मनात हे ऐकून एक आशा पल्लवित होतेय -- हे असं जर तुमच्या स्वभावात असेल तर तुम्ही वाचण्याची शक्यता वाटतेय मला !

वाघ: वाचण्याची ?

राधा: हं, ते जाऊं दे ! फक्त तुमचा हा स्वभाव चांगला की वाईट ते सांगता येणार नाही एवढं खरं ! पण असं काय होतं डॅडी, जे तिला सांगायचं राहिलं ?

वाघ: ते आता तुला सांगावं की न सांगावं यावर मला विचार करावा लागेल.

राधा: मग ही नुसतीच एक उत्सुकतेची रुखरुख माझ्या मनाला कशाला लावून ठेवलीत डॅडी ?

वाघ: हेच तर माझं चुकतं ना ! पण माझ्या चुकांचाही काहीतरी रोल असेलच ! म्हणून तर त्या घडतात ना माझ्या हातून !

राधा: हं ते आहे ! ( इथे हे दृश्य संपते. हळूहळू अंधार होतो. अंधारात मॉबच्या आवाजात नुसते ' हे-हे, हे-हे, हे-हे '....असे जोरात आवाज. पुढील दृश्य पांढऱ्या पडद्यावर. प्रकाश पडत जातो तसा अजय येतो. झब्बा, लेंगा, शबनम पिशवी, कोरडे केस, दाढी -- असा. हा अर्थात विजयचा जुळा भाऊ म्हणून हमशकल. )

अजय: मी अजय. या पिक्चरमधलं एक कॅरॅक्टर म्हणून म्हटलं तर मला काही माहिती नाही. माझा खून होईपर्यंत माझा रोल आहे. त्या खुनाचा कुणी सूड घेणार की नाही हेही मरताना मला माहीत नसतं. आम्ही दोन जुळे भाऊ. मी आणि विजय. दोनतीन भावंडं बिछडली जाण्याची एक जनरल पध्दत अशी असते की आईनं सगळ्या भावंडांना एकच गाणं शिकवायचं आणि मग त्यांना हरवायला जत्रेत न्यायचं. ते गाणंही जनरली जिंदगीत कसं वागलं पाहिजे -- किंवा जिंदगी म्हणजे काय याच्यावर असतं. पण आमचा पुन्हा भेटायचा प्रश्न नसल्यामुळं तसलं गाण आम्हाला शिकवलेलं नाही. तर आम्ही लहान असताना वडील अपघातात वारले. नंतर निव्वळ दारिद्र्य होतं. कसंबसं सांभाळत होती आम्हाला आई. लोकांची घरकामं आणि मुख्य म्हणजे शिवणकाम करून. आम्ही बारा वर्षांचे असताना शाळेत एक मुलगा आमच्या आईला झाडूवाली म्हणाला म्हणून मी त्याला बेदम मारला. याची आईकडे तक्रार आली. ती आधीच थकलेली, उबगलेली असायची. त्यात हे ऐकल्यावर तिचा तोलच ढासळला. तिनं माझं काहीही ऐकून न घेता मला खूप मारलं. खूप म्हणजे अतीच. त्याच्या रागानं मी घरातून पळून गेलो. दुसऱ्या गावी गेलो. तिथे एका प्रेमळ शिक्षकानं मला वर्तमानपत्रं टाकायचं काम मिळवून दिलं आणि शिकायला मदत केली. पुढं शिकवण्या वगैरे करत मी ग्रॅज्युएट झालो. या काळात, मादक द्रव्यांच्या विळख्यात सापडलेल्या तरुणांची काय अवस्था होते हे मी पाहिलं. त्यामुळं याच क्षेत्रात समाजकार्य करायचं असं मी ठरवलं. ( खिन्नपणे -- ) या स्टोरीत माझं काय होतं ते तुम्हाला कळेलच. माझ्या वाट्याला हे असंच आहे त्याला मी काय करणार ? आणि हो. मधे एकदा मी घरी जाऊन पाहावं

म्हणून गावी गेलो तर आई आणि विजय मुंबईला गेल्याचं कळलं. पण पत्ता मिळाला नाही. तर या प्रकारात ही मादक द्रव्यं येतात कुठून याचा मी शोध घ्यायला लागलो. ती साखळी अण्णासाहेब मोहित्यांचा मुलगा राकेश याच्यापर्यंत जात असल्याचं माझ्या लक्षात आलं. मी त्याला भेटलो. हा उद्योग थांबवायची मी त्याला विनंती केली. यावर त्यानं आणि त्याच्या मित्रांनी माझी टर उडवली. मग मीही चिडलो. राकेशचा हा काळा धंदा बंद पाडूनच दाखवीन अशी प्रतिज्ञा मी त्याला बोलून दाखवली. त्यांनी मला ढकलून, हाकलून दिलं. पुढे मी जे प्रयत्न सुरू केले, उदाहरणार्थ पोलीस कंप्लेंट वगैरे, त्यानं अर्थातच ते चिडले असणार. मी खरोखरच हे आव्हान म्हणून घेतोय हे त्यांच्या लक्षात आलं असणार. आमच्या सामाजिक संघटनेची काही इतरही मुलं माझ्याबरोबर होती. याहून जास्त मी काय बोलणार ? ( जातो. अंधार. फास्ट म्यूझिक सुरू होते. मधेच या म्यूझिकमध्ये एक शून्य पोकळी. त्या पोकळीत पिस्तुलाचा आवाज. पुन्हा फास्ट म्यूझिक. हळूहळू ते अस्पष्ट होत जाते. पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा रात्रीची वेळ. तेच प्रि. वाघांचे घर. समोर कुणीही नाही. काही क्षण गेल्यावर बाहेर कार येऊन थांबल्याचा आवाज येतो. नंतर पावलांचा आवाज. मग बेल वाजते. एकदोन क्षण. पुन्हा बेल वाजते. राधा येते. )

राधा: कोण आहे ?

वाघ: मी आहे -- डॅडी -- दार उघड -- ( आवाज घाबरा. राधा दार उघडते. वाघ आत येतात. चेहऱ्यावर घाम. आत येऊन कसेबसे बसतात. राधा दार लावून पुढे येते. )

राधा: काय झालं डॅडी ?

वाघ: पाणी आण -- ( ती पाहते. जाते. पाणी घेऊन येते. त्यांना देते. ते पाणी पितात. रिलॅक्स व्हायचा प्रयत्न करत -- ) हं ऽ ! --

राधा: काय झालं डॅडी ?

वाघ: सांगतो. सांगतो. थांब जरा. ( फोनची रिंग होते. राधा फोनकडे जाऊ लागते -- ) थांब, तू नको घेऊस. ( कसेबसे उठतात. ती आधार देते. फोन घेतात. तोपर्यंत रिंग होतच राहते. ) हॅलो, मी प्रिन्सिपॉल वाघ बोलतोय. हं -- ( ऐकत राहतात. सौम्य पार्श्वसंगीत सुरू. चेहऱ्यावर संताप, भीती, अगतिकता यांचे मिश्रण. काही क्षण ऐकत राहतात. मग तिकडचे बोलणे बंद झाल्यावर क्षणभराने सावकाश फोन ठेवतात. तसेच उभे राहतात -- )

राधा: बसा डॅडी तुम्ही -- कुणाचा फोन होता ? ( ती त्यांना आधार देऊन बसवते. )

वाघ: अपेक्षितच होता -- हा फोन --

राधा: डॅडी --

वाघ: वाजलेत किती ? ( राधा भिंतीवरच्या घड्याळाकडे आणि ते स्वतःच्या मनगटी घड्याळाकडे पाहतात. )

दोघेही: साडेबारा --

राधा: डॅडी तुम्ही --

वाघ: सांगतो. आज विद्यापीठात एक कॉन्फरन्स होती. ती संपवून मी येत होतो. गळ्यात शबनम अडकवलेला एकजण फुटपाथवरून चालत असलेला मला दिसला. अचानक एक पांढरी कार आली. त्या माणसाजवळ जाऊन थांबली. मीही गाडी थांबवली आणि पाहू लागलो. त्या गाडीतून राकेश उतरला. त्या माणसाशी त्याची काही बोलाचाली झाली. आणि अचानक त्यानं खिशातून पिस्तूल काढलं आणि त्याच्यावर गोळी झाडली. तो माणूस खाली कोसळला. राकेश पुन्हा कारमधे बसत असताना त्याला माझी कार दिसली. तो चालत माझ्याकडे आला. मला पाहिल्यावर म्हणाला, ‘ ओह्

तुम्ही ! दुसरं कुणी असतं तर खतम् करून टाकलं असतं ! जे पाहिलंत ते विसरून जा ! ‘ (-- हे प्रीरेकॉर्डेड मोठ्या आवाजात. ) आणि तो झटकन त्याच्या कारमधे बसला. आत आणखी दोनतीनजण असावेत. ती कार निघून गेली. मग मी घरी आलो. ते प्रेत तिथंच रस्त्यात पडलेलं असेल. काय करावं ते मला सुचलं नाही.

राधा: पोलीसांना कळवावं का ?

वाघ: आल्यावर अण्णासाहेब मोहित्यांचा फोन आला. ‘ तुमचा न् आमचा काही जुना ऋणानुबंधच दिसतो ‘ -- म्हणाले .‘ गर्द प्रकरण कसं हवेत मिसळलं ते लक्षात आहे ना ? ‘ -- म्हणाले. ‘ तुमची मुलगी राधा हिला जर काही धोका व्हायला नको असेल तर गप्प बसा, काही पाहिलंच नाही असं समजा आणि विषय विसरून जा ‘-- असं म्हणाले. नाहीतर नाइलाजानं त्यांना त्यांचे मार्ग अवलंबावे लागतील म्हणे. जे घडलंय ते अशाच नाइलाजातून घडलंय -- म्हणाले. आणि फोन बंद केला.

राधा: मग आता काय करायचं ? ते सगळं दडपून टाकू शकतात हे तर आपण पाहिलेलंच आहे.

वाघ: मला खरंच काही सुचतच नाही. मला वाटतं, हा माझा स्वभावदोषच असावा. मी विचार जास्त करतो, त्याच्यात वेळ निघून जाते.

राधा: ही टोळीच असणार आहे एक.

वाघ: मलाही वाटतं की कळवावं पोलिसांना -- पण --

राधा: नाहीतरी प्रेत रस्त्यातच पडलेलं आहे -- पोलिसांना कळेलच ते -- काय प्रकार आहे ते उद्या वर्तमानपत्रात येईलच. प्रश्न फक्त साक्ष देण्याचाच आहे -- ते ठरवता येईल --

वाघ: आणि हा तर आयविटनेस -- खून घडताना मी डोळ्यांनी पाहिलेला आहे -- आणि जी माणसं खून करू शकतात ती काहीही करू शकतील -- माझ्या एखाद्या चुकीच्या वागण्यामुळं तुझंही काही वेडंवाकडं व्हायला नकोय --

राधा: तुम्हाला योग्य काय वाटतंय तेही महत्त्वाचं आहेच -- आपण उद्या विजयशी बोलून ठरवू --

वाघ: आपण पाहिलंय तर त्याला सुटू देता उपयोगी नाही असंही वाटतंय --

राधा: काढू मार्ग काहीतरी -- सध्या झोपताय का तुम्ही -- आत्ता तरी हा विचार सोडून द्या आता -- निष्कारण तब्येतीवर परिणाम होईल --

वाघ: हं ...( इथे हे दृश्य संपते. हळूहळू अंधार होतो. पुढचे दृश्य पांढऱ्या पडद्याच्या पार्श्वभूमीवर. एक खुर्ची आहे. विजय कधी बसून, कधी उठून, कधी पावले टाकत असे बोलतो --- पार्श्वभूमीवर नेहाचा कॅब्रे डान्स. रंगीबेरंगी फिरता प्रकाश. म्यूझिक. विजयचे संवाद, गाणे आणि नृत्य यांचे मिश्रण. गाणे असे :-

नाई नाई नाई नाई
नाई नाई नाई नाई
देणार नाही मी --पप्पी ऽ...
पप्पी गरम माझी
मारेल कोण बाजी
खिशात ही अत्तराची -- कुप्पी ऽ...
चावली तर रक्त काढील मला नाही माहीत
बोचकारलंन् तर उडाल अन् पडाल तुम्ही खाईत
म्यूझिक मला देईल गं -- भप्पी ऽ ...

-- गाण्याच्या शेवटी एक गोजिरवाणं कुत्रं, ती -- विजय जिकडे एक्झिट घेणार त्याच्या विरुध्द बाजूच्या विंगेतून घेऊन येते आणि एक वळसा मारून -- 'पप्पी...माझी पप्पी...' म्हणत त्याच विंगेतून जाते. विजयचे संवाद पुढीलप्रमाणे -- )

विजय: नुसती गोष्ट सांगायची असली तरी काही नियम पाळावे लागतातच -- उदाहरणार्थ -- नायक-नायिका, त्यांच्यातली मौजमजा, प्रेमगीतं, व्द्वंव्दगीतं -- हे सगळं आधीच घ्यावं लागतं. आई वारलेली दाखवायची आणि लगेच प्रेमगीत घ्यायचं -- असं करता येत नाही. गोष्ट कितीही बनावट चालते, पण सातत्याचा नियम पाळावाच लागतो. आत्ताची ही जी स्टोरीची डेव्हलपमेंट सुरू झालीय त्याच्यात मौजमजा आता शक्य नाही. गोष्ट पटत पटत पुढं सरकली पाहिजे. सुखाच्या वेळी सुख, दु:खाच्या वेळी दु:ख असं चाललं पाहिजे. वेळोवेळी रागलोभ दाखवत जात राहिलं पाहिजे. प्रेक्षकांना हे असं सातत्यच हवं असतं. आहे या मनानं दुसरं नाहीतरी काय शक्य असतं ? लोक निष्कारण गोष्टवाल्या कलेला कमी लेखतात. दर्जेदार समजली जाणारी कलाही थोड्याफार फरकानं हेच करत असते. एक वेगळं सातत्यच देत असते. प्रेक्षक एकदा याच्यात अडकले की त्यांच्या वैयक्तिक प्रश्नांचं त्यांच्या डोक्यातलं सातत्य बाजूला पडतं. मग त्यांना वाटतं मस्त गेला वेळ ! बस्स ! -- हे तरी का तर कुठल्या ना कुठल्या सातत्याशिवाय मन राहूच राहू शकत नाही. त्यामुळं थोडा वेळ, वैयक्तिक नसलेलं सातत्य मनाला मिळणं हीच त्यातल्या त्यात विश्रांती ! असो. दुसऱ्या दिवशी आमचं बोलणं झालं. प्रिन्सिपॉलसाहेब म्हणजे डॅडी गोंधळलेलेच राहिले. तिसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात बातमी आणि मृत व्यक्तीचा फोटा आला. त्यानंतर स्टोरीचं वळणच वेगळं झालं. हे सगळं माझ्यावरच येऊन आदळलं. काही घटना घडल्या. नंतर राधाकडे गेलो. ( पांढरा पडदा बाजूला होतो. विजय आता वाघांच्या घरात आहे. राधा येते. ) तू येऊन आता काही उपयोग नाही. आता गाणंबिणं होऊ शकत नाही.

राधा: कपडे बदलत होते म्हणून उशीर झाला. गाणं कसलं ?

विजय: स्वातंत्र्य कुणालाच नाही. रोल ठरलेला आहे.

राधा: होतास कुठे पण तू आठवडाभर ? एकदम बेपत्ताच झालास.

विजय: ते सांगतो सगळं. प्रिन्सिपॉलसाहेब आहेत ?

राधा: मघाशीच आलेत कॉलेजातून. त्यांच्या स्टडीत बसलेत. गेला आठवडाभर ते अत्यंत अस्वस्थ आहेत. तुम्हाला योग्य वाटेल तो निर्णय घ्या म्हटलं. माझा विचार नका करू म्हटलं. पण ते गोंधळलेलेच आहेत.

विजय: हे त्यांचं जे चाललंय नं ते एकदम चूक आहे. स्टोरीतली महत्त्वाची घटना त्यामुळं अडून राहते. चरित्रअभिनेत्यानं असं वागायचं नसतं. त्यांच्यासारख्या प्रामाणिक आणि सच्छील माणसाचा खून व्हायला नको ? आणि तोही लौकर व्हायला नको ? असा वेळ घालवून कसं चालेल ?

राधा: माझे डॅडी आहेत ते. ते एकवेळ गोंधळलेले आणि कमकुवत म्हणून बदनाम झाले तरी चालेल पण खून होऊन मरायला नकोयत मला ते.

विजय: होय, पण त्यांना आपण कसे आहोत असं लोकांना दाखवायचंय ? हेच बहुतेक त्यांचं नक्की नसावं, म्हणूनच गोंधळलेत ते. याच्यावर एक स्वतंत्र कलात्मक पिक्चर निघू शकेल.

राधा: तसं तर काय, असे कितीतरी खून इकडंतिकडं होत असतात, त्यातला हा एक डॅडींसमोर घडला एवढंच. आणि पोलीस काढतीलच की शोधून. आणि त्या खुन्याला सुटता येईल असे कच्चे दुवे ठेवणारच ते तपासात. मग डॅडींनीच कशाला धोका पत्करायला हवाय ? कुठला कोण माणूस. ( पार्श्वसंगीत. )

विजय: ' कुठला कोण माणूस ! ' -- हे तुझं वाक्य भयानक आहे. मी फक्त तुला काही सांगायला आलोय. पण एका अटीवर. तू हे कुणाला बोलणार नाहीस, असं मला वचन दे.

राधा: मी वचन देते.

विजय: तो ' कुठला कोण ' नव्हता. माझा सख्खा जुळा भाऊ अजय होता तो. ( राधाला धक्का. म्यूझिक. ) आता जुळा भाऊ हा सख्खाच असतो म्हणा ! त्यानं शाळेत मारामारी केली म्हणून आईनं त्याला खूप मारलं म्हणून घर सोडून गेला होता तो लहानपणीच. त्यानं ती मारामारी का केली होती ते आईला नंतर समजलं. त्याचं दु:ख सतत उरात वागवतच जगतेय ती.

राधा: ज्याचा खून झाला तो अजय होता ?

विजय: होय. इथून गेल्यावर दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात बातमी आणि फोटो पाहिल्यावर मला शंका आली. मी आईलाही विचारलं. तिला तर खात्रीच वाटली. मग मी चौकशी केली. पोस्टमॉर्टेम होऊन संध्याकाळी प्रेत ताब्यात मिळणार होतं. त्याच्या संघटनेचे कार्यकर्ते त्याचा अंत्यसंस्कार करणार होते. आम्ही तिथं जायचं ठरवलं. चेहऱ्यातलं साम्य लक्षात येऊ नये म्हणून मी नकली दाढीमिशा लावल्या आणि गॉगल घातला. आईला बजावून सांगितलं की तो जरी अजयच असल्याची खात्री पटली तरी तिथं आपली ओळख दिसू द्यायची नाही. त्याच्या खुन्याला शासन व्हायचं असेल तर आपण हे सत्य गुप्तच ठेवलं पाहिजे. आईनं मान्य केलं. अंत्यदर्शन घेताना तिनं त्याच्या डाव्या हातावरची जन्मखूण पाहिली आणि तिला हुंदका आवरला नाही. मी कसंबसं तिला घरी आणलं. नंतर त्याच्या अंत्ययात्रेला मी गेलो. अस्थि-विसर्जनालाही गेलो. त्याच्या मित्रांच्या ओळखी झाल्या. हळूहळू त्यांनाही माझी ओळख देऊन गुप्तता ठेवायला सांगितलं.

राधा: हे असं का घडतं सगळं ?

विजय: कदाचित तुझ्या डॅडींचा खून झाल्यानं मला पुरेसा संताप आणि चेव येईल की नाही आणि शिवाय तो खरा वाटेल का अशी स्टोरीरायटरला शंका आली असावी. म्हणून हे सगळं घडलं असावं.

राधा: मग आता पुढं काय ?

विजय: आई भयंकर दु:खात आहे. ( संताप एकवटत --) माझ्या भावाला मारून मला आणि विशेषत: माझ्या आईला इतकं दु:ख देणाऱ्याला मी सोडणार नाही. मी पोलिसांवरही अवलंबून राहणार नाही. शासन करायचे आणि न्याय मिळवायचे मार्ग माझे मी शोधून काढीन. ( जरा नॉर्मल आवाजात --) पण यातलं तू कुणाला काही बोलू नकोस. डॅडींमुळं निदान खुनी कोण आहे हे तरी कळलंय. पण खून कुणाचा झालाय हे त्यांना सांगू नकोस. कारण त्यामुळं त्यांना अधिकच अपराधी वाटेल. ते नकोच. तो माझा भाऊ आहे, म्हणजे होता हे त्यांना कळायला नको.

राधा: वर्तमानपत्रातला तो फोटो पाहिल्यावर तुमच्या चेहऱ्यांतलं साम्य आमच्याही लक्षात आलं होतं. आमचं बोलणंही झालं होतं. पण तेवढंच.

विजय: ते तसंच सोडून दे.

राधा: अजयची एकूण सगळी हकीगत कळली असेल ?

विजय: ते सगळं मी नंतर सांगेन तुला. आता काही दिवस मी इकडे येणार नाही. तू काहीतरी थाप मार.

राधा: मी येते तुझ्याबरोबर.

विजय: सध्या नको. आपलंच काम त्यामुळं अवघड होईल.

राधा: तुझ्याशिवाय मी जगू शकत नाही, हे लक्षात ठेव.

विजय: हो. ( तिला जवळ घेतो. ) काही काळजी करू नकोस.

राधा : तू हीरो आहेस हे माहीत असलं तरी काळजी करणं हे माझं कामच आहे.

विजय: त्यावेळी एखादं विरहगीत म्हणून टाक. ( इथे अंधार होतो आणि हे दृश्य संपते. आता अंधार असतानाच नुसते रेकॉर्डेड संवाद :--

मोहिते: राकेशला सध्या तिथेच थांबू दे. इकडे जरा गडबड मिटू दे-- बरं हिरालालची काय हकीगत ?

त्यांचा माणूस: तो आता आपल्या ताब्यात आहे.

मोहिते: आण त्याला. ( त्याला ओढत -- ढकलत आणल्याचे आवाज. )

त्यांचा माणूस: रहीमकडून पैसे घेतल्याचं कबूल करतोय तो. माफी मागतोय. पुन्हा असं होणार नाही म्हणतोय.

हिरालाल: ( रडत -- ) माफ करा बॉस - बॉस -- बॉस -- ( खाडकन पिस्तुलाचा आवाज. काही क्षण शांतता. पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा प्रि. वाघांचे घर. वाघ वर्तमानपत्र वाचताहेत. त्यांच्यासमोर चहाचा ट्रे. चहा पिऊन झालेला आहे. अण्णासाहेब मोहिते येतात. )

मोहिते: येऊ का प्रिन्सिपॉलसाहेब ?

वाघ: हं -- या. कशासाठी आलात ?

मोहिते: बसा नाही म्हणत ?

वाघ : बसा.

मोहिते: ( बसत -- ) तुम्हाला सांगतो, मी स्वत: कुणाचा तरी विश्वासघात करूनच मोठा झालोय -- म्हणजे हा आता आहे असा ! पण याचा अर्थ माझा कुणी विश्वासघात करायचा प्रयत्न करावा का ?! माझ्या शत्रूकडून, आमच्या एका गुप्त माहितीच्या बदल्यात, पैसे घ्यावे का ? ! कसं चालेल हे ? ! मग याची जागा कुठली? यमसदन ! यमसदन माहिती आहे नं -- दिला तिकडं पाठवून ! असं आपल्याला लावायचं तत्त्वज्ञान आणि दुसऱ्याला लावायचं तत्त्वज्ञान यांत असा हा फरक फक्त मीच करतो असं थोडंच आहे ! उलट -- हा फरक जेवढा जास्त तेवढे तुम्ही जास्त मोठे होत जाता ! असं का म्हणून विचारा ना ! संतवाङ्मय वगैरे वाचता की नाही ! ते काय म्हणतात, मन म्हणजे अंतर्विरोध ! मी आणि इतर जग, असा विरोध असल्याशिवाय मन कुठलं असणार हो ! तर हा अंतर्विरोध जेवढा मोठा, तेवढं मन मोठं ! मोठ्या मनाचा माणूस लहान कसा राहील हो ! मोठाच होणार तो ! पावरफुलच होणार ! काय ! मी वाटतो का नाही तुम्हाला पावरफुल ? ।

वाघ: बरं नेमकं कशासाठी आलायत ते सांगितलं नाहीत -- अजून !

मोहिते: तुम्हाला भेटावंसं वाटलं, आलो. समजुतदार लोकांशी संपर्क असावा !

वाघ: मी समजुतदार आहे की भित्रा आहे हे अजून माझं मलाही कळायचंय !

मोहिते: नाही, नाही, नाही, नाही ! अहो, भित्रा माणूस समजुतदार असू शकत नाही असं थोडंच आहे ! प्रिन्सिपॉलसाहेब, तुमच्याकडे किती आदरानं पाहतो आम्ही सगळे -- आणि तुम्ही जे काय करताय तो समजुतदारपणाच आहे ही माझी तरी खात्री आहे. आणि मी आता यापुढं जे बोलणार आहे त्याला तुम्ही होकार दिला की मी जे म्हणतोय ते तुम्हालाही पटेल.

वाघ तुम्ही धमकी द्यायला आला आहात. फोनवर दिलेलीच आहे, ही समक्ष.

मोहिते: नाही, नाही, नाही, छे छे, हे काय बोलताय तुम्ही ! छे। आत्ता मी धमकी वगैरे द्यायला आलेलो नाही. त्याच्याहून महत्त्वाच्या -- उलट चांगल्या कामासाठी आलोय !

वाघ: म्हणजे खून !

मोहिते: चांगलं काम म्हटलं मी ! तुम्ही राग फार मनात धरून बसता बुवा ! झालं, गेलं, संपलं ते ! तेच धरून

बसून चालतंय काय ! पुढचं जगावंच लागतं की नाही ! शिवाय तुमचं आवडतं काम -- लोकशिक्षण करणं, भाषणं देणं -- याला कधी विरोध केलाय का आम्ही ? हेही होतच राहिलं पाहिजे. आणि एवढं सगळं असून कळूनसवरून लोक अशा मादक द्रव्यांच्या वगैरे चुकीच्या मार्गाला गेले तर आपण काय करणार ? आमचं म्हणाल तर असं कळून सवरून आलेले फार चांगले. ते पार खड्ड्यात जाण्यासाठीच जन्माला आलेले असतात. त्यामुळं कळायची सोय पाहिजेच ! तुमच्या कार्याची आम्ही उलट प्रशंसा करतो ! आमच्यातही गुणग्राहकता आहे !

वाघ: ठीक आहे. आता डायरेक्ट मुद्याचं बोला !

मोहिते: ते तर बोलतोच, पण तुम्ही राग सोडा बुवा ! आणि एक लक्षात ठेवा की एक हुकुमाचं पान माझ्या हातात आहे, ते मी खेळलेलं तुम्हाला आवडणार नाही. गेली काही वर्षं हे पान माझ्या हातात आहे, पण मी जाणीवही दिलेली नाही तुम्हाला. उगीचच काहीतरी विस्कटत बसणं मला आवडत नाही. सध्या तुम्ही याचा काही विचार करू नका. कदाचित् मी हे पान कधीच खेळणार नाही. पण तुम्हीसुध्दा मला हे पान बाहेर काढायला भाग पाडायचं नाही.

वाघ: कुठलं पान ? कशाबद्दल बोलताय ?

मोहिते: त्या विषयावर मी खरंच बोलू इच्छित नाही, प्रिन्सिपॉलसाहेब ! तर आता मला जे बोलायचं आहे ते बोलू का ?

वाघ: बोला.

मोहिते: मी, तुमची मुलगी राधा हिला, माझा मुलगा राकेश याच्यासाठी मागणी घालायला आलोय ! ( पार्श्वसंगीत ...संताप पाहून -- ) पूर्ण ऐकून तर घ्या.! त्यानं तिला पाहिलेलं आहे. त्याला ती आवडलेली आहे. आणि मुख्य म्हणजे जे काय तुम्ही पाहिलं होतंत ते गिळून गप्प बसलेले आहातच की नाही तुम्ही -- हे गप्प बसणं, आपण आपल्याच जावयासाठी करतोय म्हटल्यावर तुम्हाला अपराधी पण वाटणार नाही. आपल्या माणसाला जरा सांभाळून घेणं हे अनैतिक आहे असं कुणीच मानत नाही. भरपूर संपत्ती आहे, कशाची ददात नाही, मुलगी ऐषआरामात राहील तुमची !

वाघ: बस्स ! कृपया याहून जास्ती काही बोलू नका. एकतर तिचं लग्न हे फक्त मी होकार देण्यावर अवलंबून नाही आणि दुसरं म्हणजे मी कधीच याला होकार देणार नाही. तुम्ही जाऊ शकता --

मोहिते: म्हणजे रागच धरून बसायचंय तुम्हाला. पण एक सांगतो तुम्हाला. आमचा राकेश जरा हट्टी आहे. त्याच्या मनानं एखादी गोष्ट घेतली की ती तो मिळवतोच ! हे असं त्याचं लहानपणापासूनचं आहे बरं का ! म्हणेल ते हजरच नं ! त्यानं मागितली आणि ती गोष्ट देणं शक्य नाही -- असं आमचंही नव्हतंच ना ! गरीब लोकांची मला कधीकधी दया येते ! बिचारे काहीच करू शकत नाहीत त्यांच्या मुलांसाठी ! मला मात्र या गोष्टीचा अभिमान आहे -- पूर्ण लाडात वाढवलंय आम्ही राकेशला ! त्याला चिंताच नाही कसली ! आमचं त्याला सतत संरक्षण राहणार -- आम्ही नेहमी त्याचीच बाजू घेणार -- याबद्दल कधी शंका घ्यायचं कारणच पडलं नाही त्याला ! त्यामुळं जरा वन-ट्रॅक माईंड म्हणतात ना तसं झालंय बघा त्याचं ! एक म्हणजे एक ! सोडतच नाही ! त्याच्या मनानं एखादी गोष्ट घेतली की ती मिळवल्याशिवाय त्याला चैनच पडत नाही.

वाघ: ( प्रत्येक शब्दावर जोर देत -- ) पण हे शक्य होणार नाही !

मोहिते: बरं मग, निघतो मी. पण हा काही मी तुमचा अंतिम निर्णय समजत नाही. विचार करा. राधाचाही विचार घ्या. शेवटी अनेक लोकांच्या ताटांत दु:खाचं जेवण वाढण्यापेक्षा शहाणपणाच्या मार्गानं जाणंच बरं, हे तुमच्याही लक्षात येईल. कारण कुठलीही गोष्ट विस्कटणं, कसलाही विनाश करणं हे उगीचच

स्वत:हून करायला मला आवडत नाही. पण त्याचबरोबर दुसऱ्यांनीही मला असं करायला भाग पाडायचं नाही -- याची काळजी घेतली पाहिजे -- एवढंच माझं मागणं असतं.

वाघ: कृपया, आपण आता जा ! --

मोहिते: तीन दिवस तुमच्या होकाराची आम्ही वाट पाहू. चौथ्या दिवशी मात्र मग मी जबाबदार राहणार नाही. तुमची मुलगी आमच्या घरची सून होणार याच्यात मला काही शंका नाही. तेव्हा, राकेश हा तुमचा होणारा जावई आहे असं समजून वागा, म्हणजे झालं ! अच्छा ! चलतो मी ! तुमचा अमूल्य वेळ घेतला, थोडाफार तुम्हाला मनस्तापही झाला असेल तर त्याबद्दल मी खरोखर माफी मागतो. जाऊ ? ( वाघ काहीच बोलत नाहीत. मोहिते झटक्यात निघून जातात. कार जोरात गेल्याचा आवाज. ते गेल्यानंतर काही क्षणांनी राधा येते. )

राधा: मोहिते कशासाठी आले होते ? घाईघाईनं कारमधे बसलेले मी पाहिले. कार फार वेगात गेली. काय झालं ?

वाघ: ते कशासाठी आले होते हे मी तुला सांगूसुध्दा इच्छित नाही. या धमक्यांच्या चक्रात आपण सापडलो तर एकतर गुलाम होणार किंवा मृत्यू जवळ करावा लागणार. या कचाट्यातून बाहेर पडायचा मार्ग कसा सापडेल तेच कळत नाही.

राधा: आता काय दिली धमकी ?

वाघ राकेशसाठी तुला मागणी घालायला आले होते. ( इथे पार्श्वसंगीत सुरू. ) मी राकेशचा सासरा झालो म्हणजे मग तत्त्वाला मुरड घालणं मला जड जाणार नाही असं म्हणत होते.

राधा: मग ?

वाघ: हाकलून दिलं मी त्यांना. पण त्यांनी तीन दिवसांची मुदत दिली आहे. तेवढ्यात जर आपला होकार गेला नाही तर पुढं काहीही होईल अशी धमकी दिली त्यांनी.

राधा: वेळ पडल्यास मी मृत्यू पत्करीन पण असल्या घाणेरड्या माणसाशी लग्न करणार नाही.

वाघ: आपण त्यांना घाणेरडे समजतो म्हणूनच तर त्यांच्यात जिद्द तयार होत नसेल ?

राधा: आणि चांगले समजलो तर प्रोत्साहन मिळेल !

वाघ : आपण त्यांना प्रॉब्लेम तयार करतो आणि ते आपल्याला !

राधा: काय व्हायचं ते होवो. पाहू.

वाघ: ते तुला पळवूनही नेऊ शकतील.

राधा: मी वेडी झाले किंवा आत्महत्या केली तर या खटाटोपाचा त्यांना उपयोग तरी काय ?

वाघ: त्यांना फरक तरी काय पडणार आहे ?

राधा: ठीक आहे. माझं आयुष्य संपायचं असेल तर संपू दे. असल्या लोकांची आणि आपली समोरासमोर भेट व्हावी हे काही आपण घडवून आणलेलं नाही. नशीबच असेल हे !

वाघ: आपण एकटे आणि त्यांची ताकद प्रचंड ! एकमेकांना त्रास न देता माणसं का जगू शकत नाहीत हेच कळत नाही.

राधा: या सगळ्या प्रकारात, विजय आपल्या बाजूला आहे हे फार महत्त्वाचं आहे. त्यामुळं एकदमच किरकोळ, सामान्य माणसांसारखा विचार आपण करायची गरज नाही. ( इथे अंधार होऊन हे दृश्य संपते. पुढील दृश्य पांढऱ्या पडद्यावर. समोर सेटी असून प्रेक्षकांच्या बाजूला आरसा आहे, अशी कल्पना. नेहा ही डान्सर साडी नीटनेटकी करून लिपस्टिक वगैरे लावते आहे. पंजाबी माणसाच्या वेषात विजय येतो. )

विजय: माझ्या एकूण प्रयत्नात मी इकडे मोहित्यांच्या हॉटेल ' पद्म ' मध्ये आलो... कुणाच्या लक्षात येऊ नये म्हणून वेषांतर केलं. ही नेहा डान्सर. हिच्याबरोबर नाचात सहभागी झालो. तर विशेष म्हणजे नंतर तिनं मला या रूमवर बोलावलं. ही मला ओळखणं तर शक्य नाही. मग काय भानगड ? ( प्रेमनाथप्रमाणे पंजाबी ढंगात -- ) हमे कायकू बुलाया होय ? कुछ काम है तो बोलो, जान हाजिर करेगा !

नेहा: ( सावकाशपणे, गोवन ढंगात -- ) ते सगळं जाऊं दे. मी तुला ओळखते. कसं ते नंतर कळेल. तुला ज्यांचा सूड घ्यायचाय त्यांचाच मलाही सूड घ्यायचाय. माझ्या जीवनाचा नाश केलाय त्यांनी. आणि आता आपला एकमेकांवर विश्वास बसला असं धरून पुढं जाऊ -- हां ! ए आता जरा दुसरं बोलते हां ! हा स्टोरीरायटर फार चांगला आहे रे ! माझा कॅब्रे त्यानं आधी घेतला. कधी ? राकेश अजयचा खून करून येतो ना तिथे. बरं झालं ना ! या पिक्चरमध्ये नंतर माझ्याबद्दल पब्लिकला सहानुभूती तयार होते ना ! सहानुभूती वाटल्यावर सेक्सअपील कसं होणार -- म्हणून आधी घेतला डान्स ! त्यामुळं आवडेल रे लोकांना ! ते जाऊं दे ! मला असल्याच गोष्टींचा अभिमान वाटत आला कायम ! मला म्हणजे नेहाला ! लोक माझी वाहवा करायचे, गर्दी करायचे, घायाळ व्हायचे आणि इथलं उत्पन्न हजारो रुपयांनी वाढायचं तर मी किती यशस्वी असं वाटायचं मला ! पण आता कळायला लागलंय ! वाया गेलं सगळं आयुष्य ! पण नाही तरी मी काय करणार होते रे -- वाया न जाणारं !

विजय: तुझं दु:ख मला समजतं --

नेहा: मी तुला सगळी माहिती देईन. तुझा टेलिफोन नंबर मला सांगून ठेव. तिथं तू किंवा कोण असणार ते सांगून ठेव. हा माझा नंबर ठेव -- ( पर्समधून कार्ड काढून देते. तो खिशात ठेवतो. ) राधाच्या लग्नाबद्दल मी काय सांगते ते ऐक -- ( अगदी हळू आवाजात काही सांगते, नंतर -- ) आता इथे जास्त थांबू नकोस. कुणी विचारलं तर तू मला पाच हजार रूपये देऊन गेलास असं मी सांगणार आहे. जा ! ( विजय तिच्या हाताचं चुंबन घेतो आणि जातो. ती पुन्हा आरशात पाहात असताना अंधार होतो. पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा अर्थातच प्रिन्सिपॉल वाघांचे घर. बेल वाजते. वाघ येतात. दाराकडे जाऊन दार उघडतात. त्याच पंजाबी वेषात विजय येतो. )

वाघ: कोण तुम्ही ? काय काम आहे ?

विजय: मी विजय. काही कारणानं हा जरा बदल केलाय. तुम्ही एकटेच आहात म्हणून आलोय. फक्त तुमच्याशीच बोलायचंय.

वाघ: बोल. आणि होतास कुठे इतके दिवस ? तुझ्या फॅक्टरीत विचारलं तर आठ दहा दिवस तू येणार नाहीस, म्हणाले.

विजय: मी एका महत्त्वाच्या कामात आहे. मला कळलंय सगळं. तुम्ही कोणत्या काळजीत आहात ते मला माहीत आहे. स्वत:ला निराधार समजू नका. मी या पिक्चरचा हीरो आहे हे विसरू नका.

वाघ: माझी पत्नी सावित्री वारल्याला काही वर्षं झाली. हल्ली मला तिची फार आठवण येते. ती असती तर तिनं यातनं काहीतरी मार्ग काढला असता. अडचणीच्या वेळी तिनं नेहमीच साथ दिली मला.

विजय: काय ठरवलंत मग तुम्ही ? ( पार्श्वसंगीत. )

वाघ: मीही तुमच्याविरुध्द साक्ष देत नाही आणि तुम्हीही हा लग्नाचा आग्रह सोडून द्या असं म्हणून मिटवून टाकू. म्हणजे दोन्ही कटकटी मिटतील.

विजय: म्हणजे त्यांची सरशी होणं तुम्हाला मान्य आहे !

वाघ: करणार काय मग ?

विजय: माझ्या डोक्यात एक प्लॅन आहे.

वाघ: बोल.

विजय: तुम्ही होकार कळवा. ( पार्श्वसंगीत. )

वाघ: काय ! ( चकित. )

विजय: पुढचं मी पाहून घेईन.

वाघ: पण --

विजय: माझ्यावर विश्वास ठेवा आणि मी सांगतो तसं करा. काहीही वाईट होणार नाही.

वाघ: अरे पण प्लॅन तरी काय आहे ? आणि तो फेल झाला तर ?

विजय: तुम्ही फक्त माझ्यावर विश्वास ठेवा. या पिक्चरची स्टोरी मला माहीत आहे म्हणून सांगतोय. आणि – बरं, जातो मी. एवढंच सांगायला आलो होतो. अच्छा ! ( जातो. वाघ बसतात. विमनस्कपणे बसून राहतात. दारात वसुंधरा येते. वय सुमारे ४५. तिथे उभी राहून बेल वाजवते. वाघ पाहतात. चकित होतात. )

वाघ: वसुंधरा -- तू !

वसुंधरा: मला सगळं कळलं आहे. कोणत्याही परिस्थितीत हे लग्न होता कामा नये. तेच सांगायला आलेय मी --

वाघ: पण --

( इथे पडदा पडत जातो... )

**अंक पहिला समाप्त**

## अंक दुसरा

( पहिले दृश्य -- प्री रेकॉर्डेड -- पडदा उघडण्यापूर्वी. तरुणपणातले वाघ. ' एक्स्क्यूज मी -- ' म्हणतात. एक माणूस -- साऊथ इंडियन -- ' बोला ' -- म्हणतो. पुढे -- )

वाघ: माफ करा, इथे वसुंधरा वर्टी राहात होत्या ना हो ?

माणूस: हाँ ! राहात होते ! ग्येले ती ! तिची आईला घ्यून ऱ्हात होती ! मग आई वारून गेली ! ही पोरगी पण बघा, लग्नाच्या आदीच दिवस ऱ्हायलीवती ! सोडून गेली ! गावच सोडलं ! आता आमी ऱ्हातो हितं !

वाघ: असं असं !

माणूस: कुठं गेली कुणाला सांगिटलं न्हाई ! तुमची कोण होती का काय हो ती ?

वाघ: हं, नाही, पण --

माणूस: वाईट झालं -- ( क्षणभराने -- ) का हो, तुमच्या डोळ्यांत पाणी आलं की ! कोण होती हो ती ? लग्नाच्या आदीच असं करून बसली हो ! फशिवलं आसल कुणीतरी !

-- इथे हे दृश्य संपते. पडदा उघडतो तेव्हा पहिल्या अंकाच्या शेवटचे दृश्य पुढे चालू. वाघ पाहताहेत. वसुंधरा उभी. )

वाघ: बस -- बस ना --

वसुंधरा: तुला वाटेल की मी तुझी निर्भर्त्सना करायला आलेय. किंवा तुझा सूड घ्यावा असं मला वाटत असेल.

वाघ: आल्यावर मी तुझा शोध घ्यायचा प्रयत्न केला पण मला तुझ्याबद्दल हकीगत, पत्ता काही कळलं नाही.

वसुंधरा: प्रेम केलं आपण. एकमेकांच्या विश्वासानं लग्नाआधीच नको त्या गोष्टी घडल्या. नंतर तुझं

उच्चशिक्षणासाठी अमेरिकेला जायचं ठरलं. तू आल्यावर आपण लग्न करायचं असं आपलं ठरलं होतं. पण तू गेल्यावर लौकरच माझ्या तक्षात आलं की मला दिवस गेले आहेत. त्यात आई वारली. मी तुला पत्रही पाठवलं. पण तू उत्तर पाठवलं नाहीस. का पाठवलं नाहीस उत्तर ?

वाघ: मुलगा झाला की मुलगी ?

वसुंधरा: उत्तर का पाठवलं नाहीस माझ्या पत्राचं ?

वाघ: आल्यावर पाहू म्हटलं. उगीच लेखी काही नको म्हणून ! अडथळे आले असते ! माझ्या घरच्यांकडूनही ! --

वसुंधरा: हो, कारण लेखी पुरावा मिळाला असता मला आणि मी तुला खड्डयात घालणार होते !

वाघ: चुकलं माझं ! मला माझी जबाबदारी टाळायची नव्हती पण मी अशा प्रकारचा माणूस आहे, असंही व्हायला – दिसायला नको होतं मला !

वसुंधरा: मग मी ते गावच सोडलं आणि या शहरात येऊन राहिले. इथल्या एका महिलाश्रमानं मला आधार दिला. नंतर मी माझ्या पायावर उभी राहिले.

वाघ: माझ्या प्रश्नाचं उत्तर दिलं नाहीस ! ?

वसंधरा: तो महिलाश्रम कुणाचा आहे माहीत आहे ? अण्णासाहेब मोहित्यांचा ! ( पार्श्वसंगीत. )

वाघ: पण --

वसुंधरा: बोलण्याच्या ओघात, मी कुठल्या गावची, वगैरे बोलून गेले होते मी. नंतर एकदा मला असं दिसून आलं की माझी सगळी माहिती त्यांनी काढलेली आहे ! तुझ्यामाझ्यातल्या संबंधांसकट !

वाघ: म्हणजे ते जे हुकुमाचं पान म्हणाले ते हेच असणार ! म्हणजे वेळ पडल्यास ब्लॅकमेल करू इच्छितात ते मला !

वसुंधरा: ते काहीही करू शकतील ! काहीही म्हणजे अगदी काहीही ! ( दोन क्षणांनी -- ) त्या आपल्या संबंधांतून मला मुलगी झाली ! सध्या ती मोहित्यांच्या हॉटेल ' पद्म ' मध्ये डान्सर आहे. नेहा तिचं नाव. ( वाघ सुन्न. इथे अचानक विजय प्रवेश करतो. त्याच्या मागोमाग राधा, मोहिते व नेहा. )

विजय: उरका लौकर ! च्यायला, नाही त्या सीनवर इतकं फूटेज घेऊन कसं चालेल ! माझ्या नावावर बघतात लोक पिक्चर ! स्टोरीबिरी असेल काही, पण -- पण लोक माझ्यामुळं येतात -- काय च्यायला साधं लफडं ते काय आणि फूटेज किती खातायत --

वसुंधरा: ( आहे त्याच बेअरिंगमधून -- ) हे अगदी खरं आहे -- हा हीरो असला की सगळं खरं वाटतं --

विजय: मग ?

वाघ: अरे काय झालं ? ( वसुंधराही बेअरिंग सोडून पुढे येते. ) अरे, तुझं महत्त्व कोण नाकारतंय का ? जा, जा, जास्त चर्चा नको, ऐक माझं, जा. असं सीन चालू असताना हे काय मधेच, अं --

राधा: चल रे, तुझं फूटेज अजून वाढवायला सांगू --

विजय: पण यांचं कमी केल्याशिवाय माझं कसं वाढणार ? मी जास्त दिसायला पाहिजे !

वाघ: बरं, बघू आपण ते, पण सध्या तर जा -- हं -- ( विजय जातो. त्याच्या मागोमाग राधा, मोहिते आणि नेहाही जातात. ) हं -- ( बसतात. वसुंधराला -- ) हं, तू तिकडे -- ( ती मूळ जागी जाते. वाघ सुन्नपणाचे बेअरिंग घेतात. ती तिचे. ) माझं तर डोकं सुन्न झालंय !

वसुंधरा: मोहित्यांचा मुलगा राकेश याचे नेहाशी सक्तीचे संबंध आहेत ! या प्रकारे पाहिलं तर तो एक बेकायदेशीर जावई आहेच तुझा ! आता फक्त राधाशी लग्न करून रीतसर जावई होऊ इच्छितोय !

वाघ: म्हणजे --

वसुंधरा: होय ! नाइलाज ! तुझ्यामुळं झालंय आमचं जीवन हे असं ! ( हे शेवटचं वाक्य मोठ्या आवाजात तीनदा -- रेकॉर्डेड. ) पण तरीही, नेहाकडून समजल्यावर, राहवलं नाही म्हणून आले. आजपर्यंत याच शहरात असून, तुझी मला माहिती असूनही मी इथं आले नव्हते. हे होऊ नये.

वाघ: मला माहीत नव्हतं. मी खरंच तुझा शोध घ्यायचा प्रयत्न केला होता.

वसुंधरा: मग आता मी आलेय, तर काय ?

वाघ: फार उशीर झाला ! किती वर्षं निधून गेली !

वसुंधरा: मला माहीत आहे. तुझी लोकांसमोरची प्रतिमा मी बिघडवू इच्छित नाही. राधाही एक प्रकारे माझ्या मुलीसारखीच आहे. माझ्या एका मुलीचं वाटोळ झालंय, दुसरीचं नको, म्हणून आलेय -- ( हुंदका फुटतो. किंचित् पार्श्वसंगीत. वाघना काय करायचे ते सुचत नाही. क्षणभरानं ती सावरते. डोळे पुसते. ) ठीक आहे. मी कुठेच काहीच बोलणार नाही. निर्धास्त राहा. ( जाते. वाघ उभे. जोरात पार्श्वसंगीत. काही क्षणांनी सावकाश येऊन बसतात. विचारचक्रात विदीर्ण अवस्था. इथे अंधार होतो. पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा पांढरा पडदा. विजय येतो. )

विजय: नेहाकडून समजलं की एक दिवशी रात्री मोहित्यांचा एक ट्रक मादक द्रव्यं घेऊन आग्रा हायवेवरून जाणार आहे. पाळत ठेवून त्या ट्रकवर हल्ला केला. ड्रायव्हर-क्लीनरची भरपूर धुलाई केली. मागून आलेल्या कारमधून पाच एक्स्ट्रा उतरले. त्यांनाही धुतलं. ते कारमधून पळून गेले. क्लीनरही धडपडत आडरानात पळून गेला. ड्रायव्हरला पुन्हा हाणला. त्याला म्हटलं -- ट्रक पोलीस स्टेशनला न्यायचा आणि तिथं सांगायचं की ' माल मोहितेका है. ' कबूलच झाला. गेला तिकडे. एका हवालदारनं विचारलं ' क्या है ? ' ड्रायव्हर म्हणाला, ( रेकल्यासारख्या आवाजात ) ' माल मोहितेका है. ' आणि स्टिअरिंगवरच बेशुध्द पडला. या सगळ्या प्रकारात रमण आणि अजयचा मित्र रवी माझ्याबरोबर होते. हे सगळं मी एकटाही करू शकलो असतो, पण आहेत साथीदार तर कशाला, आणि पुढंसुध्दा साथीदार लागणारच आहेत ना ! हीरोला कोण साथीदार नाही, काही नाही, असं उगीचच गरीब नाही वाटलं पाहिजे. लागले तर अजूनसुध्दा आहेत, पण एवढ्याशा किरकोळ ऑपरेशनला कशाला ! नंतर एक दिवशी मोहिते पितापुत्रांचे फोटो लावून खाली ' गर्दचे व्यापारी ' असं लिहून भर चौकात एक बोर्ड लावला. बघायला फार गर्दी झाली. दुसऱ्या दिवशी पेपरात आलं की कुणीतरी मोहिते कुटुंबियांची बदनामी करण्यासाठी असं केलं म्हणून ! ते जाऊं दे ! आपला हेतू काय, त्यांना डिस्टर्ब करायचं ! आपल्याला आता कुणीतरी चॅलेंज देतोय हे त्यांना कळलं पाहिजे. सांगूनसवरून आमनेसामने टक्कर घ्यायची माझी पध्दत आहे. पुढचा प्लॅन सांगण्यासाठीच राधाला इकडे बोलावून घेतलं आहे. अजून कशी आली नाही ? ( राधा घाईघाईने येते. )

विजय: हं, राधा --

राधा: एक शब्द बोलू नकोस. काल ' मेहंदी ' रेस्टारंटमध्ये तुझ्याबरोबर कोण होती ?

विजय: ती होय --

राधा: एक शब्द बोलू नकोस. तू विश्वासघात करतोयस माझा -- ( रडायला लागते. )

विजय: नाही राधा, विश्वास ठेव माझ्यावर --

राधा: इतकी जवळीक -- हात हातात घेणं --

विजय: ( अधीरपणे -- मोठ्याने -- ) मी ते सगळं नंतर सांगेन राधा -- तू समजतेयस तसं ते काही नाहीय --

राधा: माझा तर जगण्यावरचा विश्वासच उडत चाललाय -- ( पुन्हा रडू लागते. )

विजय: ( जवळ येऊन समजावत -- ) असं करू नकोस राधा -- चुकतेयस तू -- शत्रूशी निकरानं लढायच्या या

वेळी आपल्यातच अशी फाटाफूट होणं, गैरसमजानं मनं शक्तिहीन होणं हे फार घातक होणार आहे राधा--

राधा: मी फक्त एक कर्तव्य म्हणून आलेय -- ( रडत -- ) मी जगू नाही शकणार तुझ्याशिवाय -- ( तो तिला जवळ घेतो. )

विजय: ( स्वत:शी -- ) हे ठीक आहे -- म्हणजे सध्या तरी मिटेल -- पुढं मिटणार आहेच -- ( उघड -- ) तू कसलीही काळजी करू नकोस -- शिवाय या गैरसमज प्रकरणावर जास्त फूटेज घालवता येणार नाहीय आत्ता -- फार तर थोडी नाराजी ठेव पण एकदम सगळी मोडतोड करू नकोस --

राधा: डॅडी घरी एकटे आहेत. अजून तर काही कळवलेलं नाही. आज आता तिसरा दिवस आहे. सकाळी डॅडींना मोहित्यांचा फोन येऊन गेला. ‘ जास्त विचार करत गप्पच बसायचं -- असं किती वेळा करणार ? ‘-- असं ते त्यांना म्हणाले. डॅडींनी काही उत्तर दिलं नाही.

विजय: त्यांनी धीरानं वागणं फार आवश्यक आहे. असले प्रसंग कदाचित प्रथमच येत असतील त्यांच्या आयुष्यात. त्यांची मन:स्थिती ठीक आहे का ?

राधा: घाबरलेत ते --

विजय: त्यांना तुम्ही होकार कळवून टाका. मग मी तुला पळवून नेईन आणि त्यांना फोन करीन की त्यांची होणारी सून माझ्या ताब्यात आहे. तिच्या बदल्यात काही पैशांची मागणी करून मी त्यांना एका ठरलेल्या ठिकाणी बोलावून घेईन. रमण आणि अजयचे बरेचसे मित्र माझ्याबरोबर असतील. कसंही झालं तरी त्यांना आता टक्कर द्यावीच लागणार आहे.

राधा: शस्त्रात्रं वगैरे आहेत ?

विजय: ती चिंता तू करू नकोस. ती सगळी व्यवस्था आहे. ही व्यवस्था कुठनं झाली, कशी झाली ते विचारू नकोस कारण ते मलाही नीटसं माहिती नाही. शस्त्रात्रांच्या चोरट्या व्यापारातनं नाही, हे नक्की !

राधा: ठीक आहे मग. तू मला पळवणारच आहेस तर त्यांना होकार कळवायला सांगते मी डॅडींना. पण मग घरी डॅडी एकटेच कसे थांबतील ?

विजय: कॉलेजच्या आवाराबाहेर त्यांनी जायचं नाही. शिवाय तिथे बाहेर आपली दोन माणसं असतील. आज रात्री खाडीच्या बाजूनं त्यांची एक कार माल घेऊन येणार आहे. तिला मी अपघात घडवणार आहे. म्हणजे पंचनाम्यात तो माल सापडेल. हे सगळं दडपत राहणं पोलीसांनाही अवघड करून टाकायचं.

राधा: पण तुला त्यांची एवढी माहिती कळते कशी ? ( पार्श्वसंगीत... )

विजय: आणखी एक व्यक्ती अशी आहे की त्यांचं साम्राज्य उलथून टाकणं हाच तिच्या आयुष्याचा मकसद आहे. ती व्यक्ती मला मदत करते. नंतर सगळं सांगेन मी तुला.

राधा: जिवावर उदार असलेली माणसं आयुष्यात आली की आपल्यालाही जिवावर उदार होणं भागच पडतं ! बरं मी निघू मग ? ठरल्यासारखं पळवून ने पण, विसरू नकोस.

विजय : निश्चिंत राहा तू. ( तो राधाच्या हाताचे चुंबन घेतो. ती घेऊ देते. मग झटकन् जाते. ) गोष्ट कितीही बनावट चालते हो ! त्यातल्या तपशीलांचा विचार करून ती थोडीफार पटणारी असावी एवढंच ! वैयक्तिक नसलेल्या गोष्टींचं सातत्य मनाला मिळालं म्हणजे झालं ! याचं कारण काय -- सातत्य सोडायला मन घाबरतं -- मग आपल्या कटकटींतून सुटका कशी होणार ? तर तात्पुरतं, आपलं नसलेलं कुठलं तरी सातत्य घ्या. दुसरं काय ? रहीमची गँग आणि मोहित्यांची गँग यांच्यातलं वैमनस्य, मारामाऱ्या -- हेही सगळं आहे बरं का -- ते सगळं घेतलंय बरोबर जोडून पण इथं नको ते ! असो ! आईचा आशीर्वाद घेऊनच बाहेर पडलोय ! लौकरच युध्दाला तोंड फुटेल ! ( जातो. अंधार होतो. पुन्हा

प्रकाश पडतो तेव्हा वाघांचे घर. वाघ अस्वस्थपणे येरझाऱ्या घालताहेत. बेल वाजते. वाघ दार उघडतात. मोहिते येतात. )

मोहिते: कालच तुम्ही होकार कळवलात आणि लगेच आज हे काय झालं ! ( सौम्य पार्श्वसंगीत. )

वाघ: ती रोज सकाळी जॉगिंगला जाते. आजही गेली होती. ती परत आलीच नाही. काही ठिकाणी फोन केले. माझे एकदोन विद्यार्थीही ठिकठिकाणी पाहून आले. आता पोलिसांत तक्रार देणंच फक्त बाकी आहे.

मोहिते: नाही, असं काही करू नका. हे आमच्या एखाद्या शत्रूचं काम आहे. मला एकाचा फोन आला होता की काल खाडीच्या रस्त्यावर जो कारचा अपघात झाला तो त्यानंच घडवून आणला म्हणे. त्यात मादक द्रव्यं होती ती आमची होती म्हणे ! मी नुसता हसलो. पण पुढं तो जे म्हणाला ते महत्त्वाचं आहे. तो असं म्हणाला की ' तुमची होणारी सून माझ्या ताब्यात आहे. पाच लाख घेऊन काळ्या डोंगरात या. ' तुम्ही काळजी करू नका. पोलिसांत कळवायची काही गरज नाही. राकेश त्याच्या साथीदारांना घेऊन गेला आहे तिकडे. तो तिला त्या हलकट माणसाच्या तावडीतून सोडवून आणेल. हा निव्वळ एक धमकीचा प्रकार दिसतो. काही होणार नाही -- काहीही होणार नाही. तो कुणाशी टक्कर घेतोय हे त्याला माहीत नसावं ! कुणीतरी नवखा फालतू माणूस असणार आहे तो. राकेश चुटकीसरशी त्याला खतम करेल ! हे एक बरंच झालं एका दृष्टीनं. होणाऱ्या पतीनं तिला दुष्टाच्या तावडीतून सोडवून आणलं म्हणजे तिलाही बरं वाटेल. नाहीतर हा असला प्रसंग राकेशच्या नशिबात कुठला यायला ! आलाय तर त्याचा फायदा घेईलंच तो ! त्या मूर्खामुळं राकेशला ही संधी मिळाली. या गडबडीत जर का तो वेडा जगला वाचला तर मी बक्षीसही देईन त्याला. खरं तर आम्हीच असं एखादं नाटक घडवायलाही हरकत नव्हती. पण सत्य हे कल्पनेपेक्षा भारी असतं -- हेच खरं ! पोलिसांत कळवू नका पण. त्याची काही गरज नाही. ( फोनची रिंग वाजते. वाघ फोन घेतात. तो मोहित्यांचा फोन असल्याने त्यांच्याकडे देतात. मोहिते रुबाबात फोन घेतात. पार्श्वसंगीत... ) हॅलो -- काय ! ( घाबरेपणाने -- ) हं -- हं -- हंहं -- बरं -- आलोच मी ! ( फोन ठेवतात. ) आमच्या लोकांना त्यांनी बरंच मारलं, शस्त्रं काढून घेतली. बॅग रिकामीच नेली होती, त्यामुळं पैशांचा प्रश्न नाही. राकेश जखमी होऊन आलाय असं कळतंय -- मी पाहतो जाऊन -- पण तुम्ही काळजी करू नका -- आपल्याकडे एकापेक्षा एक भारी लोक आहेत -- आणि मुख्य म्हणजे पोलिसांना यात घेऊ नका -- हे आम्हाला काही अवघड नाही -- आमच्या सुनेला आम्ही आजच सोडवून आणू ! अच्छा ! मी फोन करीन तुम्हाला -- ( जातात. वाघांचा चेहरा आनंदलेला. ते सावित्रीच्या फोटोसमोर जातात. उत्फुल्ल पार्श्वसंगीत... )

वाघ: ( आनंदून -- ) बघितलंस ! बघितलंस ! ( मोहिते पुन्हा प्रवेश करतात. वाघ लगेच बेअरिंग बदलतात – पार्श्वसंगीत झटकन बंद. )

मोहिते: पोलीस कंप्लेंट नको हं -- अं -- आपण पाहून घेऊ -- ( जातात. )

वाघ: ( स्वत:शी -- ) व्हिलन असून हीरोच्या तावडीतून हिरॉईनला सोडवायला चाललेत ! माझा तुम्हाला आशीर्वाद आहे मुलांनो, हिचाही आत्मा तुम्हाला आशीर्वाद देत असेल ! आणखीही एका व्यक्तीचा तुम्हाला आशीर्वाद आहे ! असो ! ते पाहू नंतर ! नाही म्हटलं तरी हे सगळं पार पडेपर्यंत धोका आहेच ! पण हा पत्करण्याशिवाय दुसरा मार्गच नाही ! एकदा नीट पार पडलं म्हणजे बरं । ( असे म्हणत बसतात. डोक्यामागे दोन्ही हात बांधून बसून राहतात. अंधार होतो. पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा -- पांढरा पडदा. समोर एक खुर्ची. नेहा नशेत लडखडत बडबडत येते. )

नेहा: ( नशेत -- ) आता मी राकेशला सोडणार नाही. ( मोहिते तिथून चाललेले असतात, ते जाता जाता

थबकतात. ऐकत राहतात. ) आता सूड घ्यायची वेळ आलीय. आता मी सूड घेतल्याशिवाय सोडणार नाही. इतकी वर्षं मी दडपली गेले, सगळे अत्याचार सहन करत गेले -- ते आता संपेल. संपून जाईल. संपून जाईल ते सगळं. नष्ट होऊन जाईल हे सगळं. मनातून धगधगत होते मी. पण कळू दिलं नाही. कळू नाही दिलं. वाट पाहात होते मी. वाट पाहात होते संधीची. विजय. यांना वाटतंय राधाला पळवलंय त्यानं. शेवटी त्यांच्याच मीलनानं शेवट होणार आहे याचा. विजय शेवट करेल या राक्षसांचा. यांना कळणारही नाही. डोकं खाजवत बसतील ही माकडं सगळी. कोण असेल हा माणूस ? कुणाचं काम असेल हे ? आणि कळतं कसं त्याला -- सगळं ? कळतं कसं ? ( हसते. जोरात हसते. मग -- ) कळतं कसं -- तुमच्या राज्यात राहूनच सुरुंग पेरीन मी. बित्तंबातमी सगळी पोचत राहील विजयला. बित्तम् बातमी -- बित्तम् -- बातमी -- बित्तम् बित्तम् बित्तम् -- बातमी बातमी बातमी -- ( हळूहळू हेच नाचगाण्याच्या ठेक्यात म्हणत राहते. ) -- मै नाचूँगी -- मै नाचूँगी --( उभी राहते, पण तोल जाऊ लागतो म्हणून पुन्हा बसते. सावकाशपणे -- ) मै नाचूँगी -- हेमामालिनी -- हेलन -- बिंदू -- वहिदा -- मैं -- नाचूँगी -- ( आवाज अस्पष्ट होत जातो. ती तशीच झोपी जाते. मोहिते झटक्यात निघून जातात. ती तशीच पडून असताना अंधार होतो. अंधारातच जोरात दोन्ही बाजूंची समूहगीते : --

१. अन्यायाची नांगी ठेचुन विजयी आम्ही होऊ
सत्य आमुचे न्याय आमुचा यशोगीत गाऊ
विजय विजय विजय विजय ...

२. राकेश आमचा हीरो आम्ही प्राणही अर्पण करू
इस पार या उस पार हा बोल सदोदित धरू
राकेश राकेश राकेश राकेश ....

पुन्हा प्रकाश पडण्यापूर्वी बेल वाजते. प्रकाश पडतो तेव्हा वाघांनी दार उघडलेले असून वसुंधरा येते. वाघ दार लावून घेतात. )

वाघ: तू होय ! ये ये !... पण तू समोर दिसलीस की माझ्यात अपराधी भाव जागे होतात.

वसुंधरा: ते योग्यच आहे. पण असं व्हावं असा माझा प्रयत्न नाही.

वाघ: तू ही सगळी वर्षं कशी काढली असशील, हे --

वसुंधरा: ते जाऊं दे सध्या. नेहाला मी योग्य ते सांगितलेलं आहे. तिला जी जशी माहिती मिळेल तशी ती विजयला देते आहे. तो तिला मधूनमधून फोन करतो किंवा कुठेतरी भेटतो. त्यामुळं त्यांच्या कुठल्याही हालचालीच्या आधी विजय सावध होऊ शकतो.

वाघ: पण विजयचा पुढं काय प्लॅन आहे हे कळत नाही.

वसुंधरा: पण तो जिंकेल ! राकेशच्या फजितीनं सुरुवात झाली !

वाघ: धोका पत्करण्याची मी आयुष्यात टाळाटाळ केली, पण आता टाळाटाळ करताच येणार नाही, अशी ही वेळ आहे. आणि आता कोणत्याही क्षणी काहीही घडेल असं मला वाटतंय -- ( पार्श्वसंगीत. )

वसुंधरा: ( क्षणभराने --) हा झालेला अपमान सहन करून बसणारी ती माणसं नाहीत. पुन्हा ते हल्ला करतीलच. नेहाचं लक्ष आहेच. तिचं आयुष्य सत्कारणी लागायची आणि तिच्यावर झालेल्या अन्यायाचा सूड घ्यायची अशी ही संधी तिला मिळालेली आहे. नाहीतर शरीरप्रदर्शन, बुभुक्षित नजरा आणि किळसवाणे स्पर्श हेच तिचं आयुष्य आहे.

वाघ: हं -- एक विचारू का ?

वसुंधरा: विचार.

वाघ: आपल्या जुन्या संबंधांबद्दल कुणाकुणाला माहिती आहे ? नेहाला ?

वसुंधरा: फक्त मोहित्यांना. नेहालाही मी हे सांगितलेलं नाही.

वाघ: मग ती का धोका पत्करतेय ?

वसुंधरा: मी सांगितल्यामुळं -- आणि सूड घेण्याची अशी संधी पुन्हा पुन्हा येत नसते म्हणूनही. राकेश आणि राधा या प्रकरणात अशी संधी मिळेल हे मीच तिला सांगितलं होतं. विजय आणि राधा एकत्र असताना तिला दाखवून त्यांची माहितीही दिली होती. पण बाकी काही तिला माहीत नाही.

वाघ : हं -- हे बरं आहे --

वसुंधरा: ( संतापून -- ) या तुझ्या वृत्तीमुळेच तुझ्या भित्रेपणाचे धक्के दुसऱ्यांना खावे लागतात. ( बेल वाजते. वाघ पटकन उठून जाणार असतात पण ती स्वत:च त्या रागाच्या मूडमध्ये जाऊन दार उघडते. मोहिते येतात. तिला पाहून स्मित करतात. मग वाघांकडे पाहतात. )

मोहिते: वा, वा, वा ! आमचं हुकुमाचं पान तुम्हीव उघडं करून बसलाय म्हणजे ! हे मला आधीपासूनच माहीत होतं. पण एखाद्याचं काळं कृत्य उघडं पाडायचं हे आपल्या स्वभावातच नाही. किंबहुना अशी कृत्यं करणाऱ्या लोकांबद्दल मला आपुलकीच वाटते. पण हीच नीतीमत्ता समोरच्या माणसानंही पाळावी अशी माझी अपेक्षा असते. ' सत्यमेव जयते ' या तत्त्वावर जग चालत नाही. जग चालतं ते ' तेरी भी चूप मेरी भी चूप ' या तत्त्वावर ! पण तुम्ही ही शिस्त मोडायची ठरवली आहे, हे उघडच आहे. शिवाय वसुंधराबाईंनाही उपकाराची जाण राहिलेली नाही.

वसुंधरा: माझ्या मुलीचं वाटोळं केलंत तुम्ही ! ( पार्श्वसंगीत... )

मोहिते: ' माझ्या ' नका म्हणू, ' आमच्या ' म्हणा ! ( वाघांकडे बोट दाखवून -- ) हे आहेत नं इथे !

वाघ: म्हणणं काय आहे तुमचं ? राधाच्या बाबतीत आम्ही होकार कळवला आहे ना ?

मोहिते: हं ऽ ! होकार कळवला आहे. होकार तर कळवला आहेच ! प्रिन्सिपॉलसाहेब, तुमच्यासारख्या चांगल्या माणसांनी -- चांगल्या म्हणजे लोक ज्यांना चांगला समजतात अशा -- अशा माणसांनी खरं तर आमच्यासारख्यांच्या फंदात पडू नये. पडलाही नसता म्हणा तुम्ही -- पण नियतीचीच तशी इच्छा होती. म्हणूनच तुम्ही तो खून पाहिलात. आणि तुमच्याशी डायरेक्ट याचा काही संबंध नसल्यानं तुमच्यात तत्त्वशीलपणा आला आणि सत्यासाठी काहीतरी केलं पाहिजे असं तुम्हाला वाटलं. एरवी तुम्हाला तरी खऱ्याखोट्याची चाड कुठं आहे ? आपली प्रतिष्ठा आणि जनमानसातली प्रतिमा जपण्यासाठी तुम्ही घरदार विकाल ! मरायला तयार व्हाल ! तुमचं जगणं म्हणजेही कुणावर तरी अन्यायच असतो. मग आम्ही तुमच्यावर अन्याय केले तर काय बिघडतंय ?

वसुंधरा: पण त्या अन्यायाचा प्रश्न माझा आहे. मी क्षमा करायला तयार आहे.

मोहिते: तुमचा काहीतरी फायदा असेल त्यात. किंवा क्षमा करण्यात तुम्हाला सुख मिळत असेल. माणूस हा प्राणी फायदातोटा बघितल्याशिवाय काहीच करत नाही ! त्यामुळं काही माणसं जगली, काही मेली, काहींनी अन्याय केला, काहींनी तो सहन केला -- हे असं चालणारच ! त्याचं वाईट वाटून घ्यायचं काही कारण नाही. कारण माणूस जगतो म्हणजे हेच सगळं ! आता त्यातलं काही गुप्तपणे असेल इतकंच ! माणूस हा मुळातच एक खोटा, अन्याय करणारा किंवा अन्याय सहन करणारा प्राणी आहे. आपण शक्यतो अन्याय करणाऱ्याच्या भूमिकेत असावं, असं माझं एक आपलं मर्यादित तत्त्वज्ञान आहे. बरं हा विजय कोण ? त्याची काय भानगड आहे ? ( थोडं पार्श्वसंगीत... )

वाघ: माहीत नाही.

मोहिते: खोटं ! किती खोटं ! प्रिन्सिपॉलसाहेब, बरं नाही हे ! माझ्या मनातली तुमची प्रतिमा मलीन नाही का

होणार अशानं ! सगळ्यांच्या मनांतली आपली प्रतिमा सांभाळावी ! मी याच पध्दतीनं निवडून येतो ! मग तुम्ही असं का करताय ? की मी एक वाईट माणूस आहे असं तुम्ही ठरवलेलं असल्यामुळं, मला काय वाटतं याचं महत्त्वच नाही ? तुमच्यासारख्या भुक्कड, भित्रट लोकांनी माणसांमधे असे चांगले आणि वाईट असे भेद करावे हे वाईट आहे. खरं तर असे भेद कुणीच करू नयेत म्हणा ! कारण चांगला माणूस मला तर कुठं दिसलेला नाही. माणूस म्हटला की तो किंवा ती वाईटच ! वाईटच !! मग कशाला भेदभाव करायचे ? ! सगळे आपलेच लोक आहेत !

वाघ: इथं आत्ता यायचं कारण ?

मोहिते: अहो, होकार कळवलाय नं तुम्ही ? होणाऱ्या व्याह्याला कुणी असं विचारेल का ? पण ठीक आहे. सांगतो. या वसुंधराबाई इकडे आल्याचं कळलं, म्हटलं प्रेमी युगुलाची एकत्रच भेट होईल आपली ! राग मानू नका, पण आमची तुमच्या घरावर नजर आहे !

वाघ: मग झाली ना भेट ! आता काय !

मोहिते: प्रिन्सिपॉलसाहेब,तुम्ही फारच अधीर बुवा ! याच अधीरपणामुळं लग्नाआधीच नको ते करून बसला तुम्ही ! सांगतो ! तुम्हाला माहिती आहे की नाही मला माहीत नाही पण तुमची मुलगी सुप्रसिध्द डान्सर नेहा हिला मादक द्रव्यांचं व्यसन आहे. ( पार्श्वसंगीत सुरू... ) तर सांगायचं म्हणजे नशेत नको ते बडबडत होती हो ती ! त्यामुळं आम्हाला कळायला नको ते सगळं कळून गेलं ना ! अर्थात् हे आम्हाला कळलेलं तिला माहीत नाही. बडबडत, पुटपुटत झोपली बिचारी ! राकेशची ती ठेवलेलीच आहे म्हणा ना -- म्हणजे एका अर्थानं तो जावई आहेच तुमचा ! आता फक्त राधाशी लग्न करून कायदेशीर जावई होईल इतकंच ! कायदेशीर असलं म्हणजे उजळ माथ्यानं सांगता येतं हो । असो !

वसुंधरा: नीच आहात तुम्ही !

मोहिते: मी, तुम्ही, हे सगळेच ! तर आता आम्ही असं करणार आहे की तिला ऐकू जाईल अशा पध्दतीनं सगळी चुकीची माहिती आपसात बोलणार. ती तिच्या पध्दतीनं प्रामाणिकपणे ते सगळं -- तो विजय का कोण हीरो -- त्याला कळवणार आणि मग तो गाळात जाणार ! असा आता थोडक्यात प्लॅन आहे. बिचारीचं आयुष्य वाहोटीला लागलंच आहे, त्यातल्या त्यात एखादं चांगलं काम, हे असं, घडून जाईल तिच्या हातून !

वसुंधरा: आणि हे सांगताय आम्हाला निर्लज्जपणे !

मोहिते: सांगतोय, कारण, तिची न् तुमची भेट आता एवढ्यात होऊ नये असाही प्लॅन आहे !

वाघ: तुम्ही भयानक आहात !

मोहिते: मी, तुम्ही, या, सगळेच ! जरा खरवडलं ना तर कुठलाही माणूस हिंसकच असल्याचं लक्षात येऊ शकतं ! जरा बाहेर डोकावून पहा. माझ्या कारजवळ दोन माणसं उभी दिसताहेत नं -- ती शस्त्रधारी आहेत ! माझं ऐकलंत तर तुमचं काही बरंवाईट करायची माझी इच्छा नाही. कॉलेजच्या आवारात हिंसा नको. आणि मुख्य म्हणजे शेवटी कन्यादान तुम्हीच करणार आहात !

वाघ: काय, म्हणणं काय तुमचं ?

मोहिते: काही नाही, बाहेर ज्या दोन कार्स उभ्या आहेत त्या पहा आणि स्वत:च्या पायांनी चालत जाऊन मागच्या कारमध्ये बसा. तुम्ही अशा ठिकाणी पोचाल की जिथं तुम्हाला त्या विजयची आईही भेटेल. तुमच्या रक्षणासाठी इथं जी दोन माणसं उभी होती त्यांना आम्ही आमच्या पध्दतीनं विश्रांती दिलेली आहे. ( पार्श्वसंगीत... ) ती माणसं वाईट नाहीत हां ! नाइलाज झाला त्यांचा ! तुम्ही एक लक्षातच घ्या की राकेश जखमी झाल्यामुळं मी फार व्यथित झालो आहे. पण ठीक आहे. असं काही ना काही घडत हे

राहणारच ! तर चला ! त्या कारमध्ये जाऊन बसा ! ( वाघ आणि वसुंधरा एकमेकांकडे पाहतात, मग निघतात -- ) घराला कुलूप वगैरे लावून घ्या हवं तर ! तुमचं घर कुणीतरी भुरट्या चोरांनी लुटावं असं मला वाटत नाही. ( वाघ संतापून पाहतात. मोहिते त्यांच्याकडे एखाद्या पाळीव प्राण्याकडे पाहावे तसे पाहातात.) घ्या ! घ्या ! लावून घ्या कुलूप ! ( इथे अंधार होतो आणि हे दृश्य संपते. पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा बाहेर कुलूप तोडण्याचा प्रयत्न चालल्याचे आवाज. शेवटी कुलूप तुटते. दार उघडून विजय आणि राधा आत येतात. थकलेले, विस्कटलेले. विजयचा शर्ट मळलेला, थोडा फाटलेला असून हातावर एक जखम आहे. )

विजय: येताना आपल्यावर हल्ला होणार याची मला कल्पना होतीच -- पण असल्या चिल्लर गुंडांना डोकं नसतं. ते नुसते ताकदीवर आणि दुसऱ्याला भयभीत करण्याच्या तंत्रावर भर देतात. काही अर्थ नसतो त्याच्यात. पण डॅडी कुलूप लावून गेले कुठं ? आणि आपली माणसंही दिसत नाहीत बाहेर ? ( तोपर्यंत तिनं औषध आणि पट्टी आणलेली असते. )

राधा: थांब मी तुझ्या जखमेला पट्टी बांधते. ( ते काम करताकरता -- ) तू बंगल्याबाहेर एवढं निरखून काय पाहात होतास ? ( पार्श्वसंगीत... )

विजय: दोन कार्सच्या चाकांचे पट्टे आणि काही माणसांच्या पावलांचे ठसे. काहीतरी घोटाळा आहे.

राधा: म्हणजे ?

विजय: माझ्या अंदाजाप्रमाणे आपण डॅडींना सुरक्षित ठिकाणी हलवण्याआधीच त्यांना पळवून नेण्यात आलं असावं ! त्यामुळं आपलं इथं येणं वाया गेलं बहुतेक ! याचाच दुसरा अर्थ असाही होतो की आपलं काय चाललंय याचा त्यांना सुगावा लागला असावा ! नाहीतर डॅडींना पळवायची काहीच गरज नव्हती !

राधा: मग -- आता -- !?

विजय: ( उठून फोनकडे जाऊन नंबर फिरवतो -- ) हॅलो, हं, नेहा ? -- हं -- मी विजय -- काय खबर ? -- हं – बरं -- हं -- म्हणजे -- बरं -- पुढं -- तू असशील तिथं ? -- हं -- ठीक आहे -- ओके -- योग्य ते करूच -- हं -- ठेवून दे ! -- गुड डे ! ( फोन ठेवतो. ) तिच्या माहितीप्रमाणे माझी आई, तुझे डॅडी, आणि तिची आई हे त्यांच्या ताब्यात आहेत. आज संध्याकाळनंतर काळ्या डोंगरातल्या आपल्या ठिकाणावर हल्ला करायची त्यांची तयारी चाललीय ! त्यामुळं तिथला -- म्हणजे हॉटेल ' पद्म ' मधला -- बंदोबस्त त्या मानानं कमी असेल असं तिचं म्हणणं ! हीच वेळ साधा -- असं ती म्हणाली. आणि ज्या अर्थी या तिघांना त्यांनी ताब्यात घेतलंय, त्या अर्थी त्यांना डाऊट आला असावा. आता फोन करू नको, असं म्हणाली ती.

राधा: तिची आई कुठनं आली यात मधेच ?

विजय: का ? तिलाही एक आई असायला काय हरकत आहे ?

राधा: थोडक्यात म्हणजे आपण जर शरण गेलो नाही तर या चौघांना ते ठार मारणार !

विजय: आपण शरण गेलो नाही आणि त्यांना ठार मारायला ते जिवंत राहिले तर !

राधा: तू एवढा खात्रीनं कसा काय बोलतोस ?

विजय: आता याचं उत्तर द्यायलाच हवं का ?

राधा: मीही येणार तुझ्याबरोबर.

विजय: तुला माझ्याबरोबर घ्यावंच लागणार आहे. तू तर मुळीच त्यांच्या ताब्यात जाता कामा नये. त्यामुळं तू येशीलच. तर तुला थोडी कल्पना असणं आवश्यक आहे, ती देतो. कारण आता हा शेवटचा भागच येईल. म्हणजे स्टोरीचा. त्यानंतरही कदाचित आपण ती पुढेही थोडीशी वाढवून काय होतं ते पाहू.

राधा: कसली कल्पना ? ( इथे विजय एकदम् गर्रकन वळतो आणि खिडकीच्या दिशेनं गोळी झाडतो. ) -- हे काय मधेच ?

विजय: बाहेर जाऊ बघ. एक माणूस मरून पडलेला दिसेल तुला. माझ्यावर गोळी झाडायला आला होता.

राधा: पण याची काय गरज होती ?

विजय: आता यानंतरच्या भागाची कल्पना जरी सगळ्यांना येणार असली तरी ते काही इथं समोर घडणार नाहीय. ते लोकेशन वेगळं आहे. थोडी झलक इथंही असावी म्हणून हे घातलंय. म्हणजे यात माझी चौफेर सावधानता, चपळता, आणि अचूकता हे आलं. मघाशी  घराबाहेरचे कार्सचे पट्टे पाहून मी काही अंदाज केले, ते बरोबर ठरल्यामुळं मी तल्लखही असल्याचं दिसलं आहेच ! असो. कल्पना देणार आहे ती लोकेशनची.

राधा: हं --

विजय: तर हॉटेल ' पद्म ' मधून एक चोर दरवाजा आहे.

राधा: तो तुला कसा सापडणार ?

विजय: नेहानंच ही सगळी माहिती दिलीय आणि तीच यात मदत करणार आहे.

राधा: चोर दरवाजा म्हणजे एका फोटोच्या मागं एक चक्र असतं आणि ते फिरवलं की भिंत सरकते तेच ना ! तसले पुष्कळ पाहिलेत मी दरवाजे ! पुढं -- ?

विजय: तर तो दरवाजा उघडल्यावर एक डाव्या हाताला आणि एक उजव्या हाताला असे दोन रस्ते आहेत. डाव्या हाताच्या रस्त्यानं गेलं तर पुढं शेवटी पायऱ्या चढून त्यांच्या मेन बिल्डिंगच्या चौथ्या मजल्यावर पोचता येतं. उजव्या बाजूचा रस्ता पहिल्या मजल्यावर जातो. तिथून मग वर जायला जिने आहेत. तर हे जे रस्ते आहेत ते तसे बंद पण वरनं अर्ध्या कापलेल्या पाईपचं छप्पर असलेले आहेत. अंतराअंतरावर त्या पाईप्सना झरोके आहेत. पण --

राधा: पण काय ?

विजय: आता हे लक्षात घे. ' पद्म '  हॉटेलपासून ती बिल्डिंग साधारण एक फर्लांगाच्या अंतरावर आहे. आणि हे जे दोन्ही पाईपलाईन रोड आहेत त्यांच्या मधल्या भागात दलदल, चिखल असून गवत वाढलेलं आहे. म्हणजे त्या दलदलीतनं जाणं अशक्यच आहे. मागं एकदा मोहित्यांचे काही शत्रू त्या पाईपलाईन रोडमधनं जायला निघाले तर यांत्रिक योजनेनं त्यानं ते झरोके पॅक करून टाकले आणि त्या बिल्डिंगच्या मागे काही अंतरावर असणाऱ्या खाडीतलं पाणी मोटरनं खेचून त्याचे होसपाईप्स त्यानं या दोन मार्गांना जोडून टाकले. दोन मिनिटांत संपूर्ण मार्गात पाणी भरून, शत्रू गुदमरून खलास झाले ! आणि ही यंत्रणा चालू करायचा अधिकार फक्त मोहितेकडंच आहे.

राधा: पण सरळ रस्तासुध्दा असेल नं कुठूनतरी -- कार्स वगैरे जाण्यासाठी ?

विजय: आहे, पण त्या रस्त्यावर अंतराअंतरावर मोहित्याची माणसं आहेत आणि रस्त्यात अंतराअंतरावर बॉम्बही पेरलेले आहेत. तो रस्ता म्हणजे जवळजवळ तीन किलोमीटरचा वळसा आहे.

राधा: मग ते चालेल नं ! तुझी कार इतकी फास्ट जाणार की कार पुढं गेल्यावर मागं बॉम्बस्फोट, कार पुढं गेल्यावर मागं बॉम्बस्फोट -- असं होणार. मग मधेच एखादा घाईनं आधीच केलेला बॉम्बस्फोट -- त्यातूनही तुझी कार जाणार -- मग तुझ्या चेहऱ्यावर, कपड्यांवर, कारवर स्फोटकाचे -- धुराचे वगैरे काळे डाग -- असं करत करत तुला पोचता येईल ! जमेल !

विजय: पण दुसरी एक नवीन आयडिया जमत असेल तर तीच कशाला वापरायची ! जमेल हे बरोबर आहे पण तेच तेच कशाला !

राधा: काय नवीन आयडिया आहे ? हॉटेलच्या गच्चीवर विमानातून पॅराशूट घेऊन उड्या मारणे आणि तरंगत तिथपर्यंत पोचणे अशी काहीतरी असेल !

विजय: त्याच्याहून भारी आहे.

राधा: थोडं सेन्सेशन वाटलं पाहिजे आणि त्याचबरोबर ते शक्यही वाटलं पाहिजे. अजिबात पटणार नाही अशी आयडिया नको.

विजय: पटणारीच आहे.

राधा: दलदलीतनं जाता येत नाही, पाइपलाईन रोडनंही जाता येत नाही, वरनं उडतही जायचं नाही -- मग कसं काय जाणार ? की जायचंच कॅन्सल करायचा तुझा विचार आहे ?

विजय: आपल्या लोकांना सोडवून तर आणायलाच हवं. माझे साथीदार मी सांगेन तसं करायला तयार आहेत. अजयच्या प्रेमाखातर ते वाट्टेल तो धोका पत्करायला तयार आहेत.

राधा: हं -- काय आयडिया आहे ?

विजय: आत्ता सांगू ? कुणी ऐकलं किंवा तूही त्यांच्या तावडीत सापडलीस आणि त्यांनी तुझ्या वडिलांना गोळी घालू नये म्हणून तुला सांगणं भाग पडलं तर ?

राधा: म्हणूनच माहीत असलेलं बरं ना ! म्हणजे त्यांना वाचवता तरी येईल !

विजय: नको. आत्ता नको.

राधा: मला अशी बुध्दिमत्तेची चमक असलेली एक आयडिया आठवते. एक आरसेमहाल असतो. त्यात, हीरो व्हिलनचा पाठलाग करत आलेला असतो. त्याच्या हातात पिस्तूल असतं. पण आता त्यात एकच गोळी शिल्लक असते. व्हिलन अशा ठिकाणी उभा असतो की सगळ्या आरशांत तो उभा असल्याची प्रतिबिंबं दिसतात. सगळी प्रतिबिंबं पण एकच यात खरा कुठंतरी आहे. गोळी एकच शिल्लक ! बरोब्बर खऱ्याला मारली तर ठीक, नाही तर खेळ खलास अशा कंडिशनमधे हीरो असतो. शेकडो व्हिलन आणि मधे हीरो एकटा उभा. व्हिलननं दोन्ही हातांत भाला धरून उगारलेला. एका हातात कातडी हातमोजा. हीरो दोन तीन क्षण पाहतो. असा ओळीऽनं पाहात जातो. आणि खाडकन गोळी झाडतो. खाडकन म्हणायचं की धाडकन ? तर गोळी झाडतो ती करेक्ट खऱ्या व्हिलनला लागते. सगळी प्रतिबिंबं लडखडतात. खरा व्हिलन धडपडत मधे येतो. मरतामरता विचारतो की तू कसं काय ओळखलंस मी नेमका कुठं आहे ते ? व्हिलन बावळट असला तरी हीरो बावळट थोडाच असतो ? शिवाय पब्लिकलासुध्दा फोड करून सांगायला हवंच असतं ना ! विचारल्यावर -- आज्ञाधारकपणे -- हीरो सांगतो की तुमने एक गलती की -- मी विचार केला सगळ्या प्रतिबिंबांच्या उजव्या हाताला कातडी मोजा होता. एकाच ठिकाणी तो डाव्या हाताला दिसला. तिथं मी गोळी झाडली ! तर अशा पध्दतीनं त्यानं शेकडो प्रतिबिंबांतून एक खरा माणूस नेमका ओळखला आणि मारून टाकला ! पण सांगितल्यावर ही आयडिया अगदीच बालिश वाटते ! आयडिया अशी पाहिजे की त्याचं अगदी कौतुक वाटत राहिलं पाहिजे. ती अगदी सोपी अशी असू नये.

विजय: पाहशीलच तू !

राधा: ( लाडाने -- ) गाणं म्हणू या एखादं ?

विजय: आत्ता ? या वेळी ? ही तर फास्ट ॲक्शनची वेळ आहे. अशा वेळी गाणं म्हटलं तर जोड्यानं मारतील लोक ! थोडी चालढकल चालेल अशा ठिकाणी गाणं चालतं. गाण्याच्या जागा बरोबर असाव्या लागतात. जीवनमरणाच्या संघर्षाची वेळ असते तेव्हा कुणी गाणं म्हणत नाही. गोष्ट अशक्यप्राय वाटली

तरी चालेल पण कुठल्या वेळी माणूस गाणं म्हणू शकेल, कधी आनंदी होईल, कधी दु:खी होईल -- हे सगळं पटणारं पाहिजे !

राधा: तू हीरो आहेस म्हणून तुझ्या भरंवशावर येतेय मी ! म्हणजे आलंच पाहिजे ! पण माझासुध्दा काहीतरी उपयोग करून घे या संघर्षात. मला नुसतं चेहऱ्यावर एकदा अचंबा, एकदा उत्साह, एकदा भीती असं दाखवत राह्यचा कंटाळा येतो. आणि दुसरं एक -- राकेश पायानं जखमी आहे, तर अशा परिस्थितीत तू त्याच्याशी मारामारी करणं शोभून दिसणार नाही. उलटं असतं तर चाललं असतं !

विजय: एवढ्या दिवसांत त्याचा पाय बरा झाला असेल. उलट मीच इतके दिवस सतत कष्ट करून किती थकलोय ! शिवाय येताना एक मारमारीही झाली ! शिवाय हाताला ही जखम आहे.

राधा: जरा विश्रांती घेतोस का ?

विजय: नाही ! अशा वेळी कितीही थकवा असला, कितीही कठीण परिस्थितीतून जावं लागलं असलं, तरी, जिद्दीनं सगळ्यावर मात करायची असते ! थांबायचं नाही ! एकदा तर मला लावलेली रक्ताची बाटली, ऑक्सिजन सिलिंडर -- सगळं तोडून फेकून मी चाल करून गेलो होतो. हॉस्पिटलमधून थेट !

राधा: मी जरा कपडे बदलून येते, मी हिरॉईन आहे !

विजय: नको, शेवटच्या दहापंधरा मिनिटात हे असलं काही करायचं नाही.

राधा: फक्त दहापंधरा मिनिटं ?

विजय: म्हणजे स्टोरीतली म्हणतोय मी ! आणि एक लक्षात घे -- आपण ठरवल्याप्रमाणे सगळं सहज पार पडेल असं नाही. त्यांना काही गोष्टी आधी कळणार, त्यांचे काही डाव अवघड असणार -- हे सगळं होणार ! हे सोपं वाटून चालणारच नाही !

राधा: मग हेच राहूं देत कपडे ?

विजय: आता मी जास्त बोलत नाही. या प्रकारात एकदा तुला कपडे बदलावे लागणार आहेत. त्यावेळी सगळ्यांचे कपडे सारखे असणार आहेत. त्यामुळं तू हिरॉईन म्हणून वेगळी उठून दिसण्यासाठी तुझा मेकप जरा जास्त उजळ करावा लागेल.

राधा: बरोबर काही घ्यायला पाहिजे का ? ( इथे विजयने सिगरेट शिलगावण्यासाठी तोंडात धरलेली. काडी ओढल्यावर फर्रर असा मोठा आवाज. विजयचे पुढील वाक्य प्रीरेकॉर्डेड -- मोठ्या आवाजात -- )

विजय: ज्या त्या वेळी लागणाऱ्या वस्तू आपोआपच त्या त्या वेळी आपल्याबरोबर असणार आहेत -- चल !

राधा: चल ! ( निघतात. )

विजय: इथंच हे दृश्य कट करायचं, म्हणजे पुन्हा जाताना त्या तोडलेल्या कुलुपाऐवजी दुसरं कुलूप लावलं का घराला -- असल्या फालतू शंका या वेळी नकोत ! ( ती दोघंही जायला निघाल्याच्या फ्रीज ॲक्शनमध्ये असताना अंधार होत दृश्य संपते. पुन्हा प्रकाश पडतो तो अगदी अस्पष्ट. पांढरा पडदा. रंगीबेरंगी फिरत्या प्रकाशात खालील दृश्य सुरू होण्यापूर्वी गोळीबाराचे एकदोन आवाज. )

विजय: ( प्रवेशून -- ) कुठलीही गोष्ट पाहताना आपल्याला वाटतं की, ही अमुक अमुक माणसं असं वागली नसती तर बरं झालं असतं – सगळ्यांचाच त्रास वाचला असता -- विध्वंस वाचला असता -- मनस्ताप वाचला असता. पण ती माणसं तशी वागणारच. अट्टाहास, हट्टीपणा, आग्रहीपणा -- अमुकच व्हावं म्हणून किंवा अमुक होताच कामा नये म्हणून -- यातूनच तर 'गोष्ट' घडत जाते -- हाच तर गोष्टीचा पाया असतो -- श्रीमंत व्हायचा हट्टाग्रह, पुढारी व्हायची ईर्षा, प्रतिष्ठेची हाव -- अशा प्रकारच्या गोष्टींतून घटनांच्या साखळ्या आकार घेत जातात. लोक म्हणतात, ' अहो, हे सगळं असल्याशिवाय माणसाची प्रगतीच होणार नाही ! महत्त्वाकांक्षा, जिद्द, स्पर्धा, सतत यशस्वी होण्याची इच्छा -- हे काही नसेल तर

जगणार तरी कसा हो माणूस ! '   म्हणजे हे पाहिजेच ! मनाचा एक भाग म्हणतो हे नको आणि एक भाग म्हणतो हे पाहिजेच ! या मनातल्या मारामारीतच तर जगायचं असतं म्हणतात ! दॅट इज लाईफ ! -- म्हणतात ! आणि हे सगळं – सगळ्यांचं सारखंच असल्यानं ज्यानं त्यानं स्वत:ला हीरो समजायला काहीच अडचण नसते ! व्हिलन म्हणजे दुसरे कुणीतरी असतात -- हेच तर सगळं असतं गोष्टीत । फार खोलात जायचंच नाही ! थोडंफार जरा पटण्यासारखं असलं म्हणजे झालं ! काही थोडं न पटण्यासारखंसुध्दा चालतं ! तर सारांश म्हणजे, जगण्याची पध्दत सगळ्यांची थोड्याफार फरकानं अशीच -- संघर्षमय -- ताणमय -- दु:खमय ! तीच थोडीफार आकर्षकपणे मांडायची हे गोष्टीचं काम ! नाहीतरी बहुसंख्य कलाकृती हेच करतात ! सूड, क्रोध, प्रेम, सहानुभूती -- अशा सगळ्या मनाच्या सवयी लक्षात घेऊनच रचावी लागते गोष्ट ! जगण्याची ही फक्त एकच पध्दत उपलब्ध आहे का, हा प्रश्न आपण प्रत्यक्ष जगतानाही विचारात नाही, मग गोष्टीत का विचारावा ! त्रास आणि दु:ख एकदा मान्य केल्यावर कुठल्याही प्रश्नाचा प्रश्न येतोच कुठं ? -- ( जातो. या दृश्यानंतर अंधार. नंतरचे दृश्य पूर्णत: ध्वनि-संयोजनाला स्वतंत्रपणे टाळ्या घेण्याची संधी देणारे आहे. या दृश्यात -- हातबॉम्ब, गोळीबार, जिन्यावरचे पाठलाग, ढिशाँव ढिशाँव, मरणाऱ्यांच्या किंचाळ्या, वगैरे, अशा वेळी असणारे सर्व आवाज. नुसते आवाजांचे दृश्य. काही काही वेळी तर नुसत्या आवाजावरून काय चालले असावे याचे अंदाज करता यावे. लांबचे आवाज, जवळचे आवाज वगैरे फरक-बदल घ्यावेत. काही वेळानं मधेच पूर्ण शांतता, नुसते सावध पावलांचे आवाज वगैरे नीट नाट्य आणावे. पुन्हा धुमाकूळ, पुन्हा आवाज. ध्वनिसंयोजकाने पूर्ण कौशल्य वापरणे आवश्यक आहे. पण मुख्य आयडिया -- तिथपर्यंत पोचण्याची -- उघडी पडेल असे आवाज घेऊ नयेत. हे दृश्य संपताना शेवटी फक्त एकाच मारामारीचे आवाज. हे अर्थातच विजय राकेशला मारत असल्याचे. तेज श्वासोच्छ्वास वगैरे. मग पुलीस-व्हॅन ऊर्फ वायरलेसचा आवाज. ' पकडो इन सब लोगोंको ' वगैरे. इथे हे दृश्य संपते. पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा वाघांचे घर. समोर डॅडी, वसुंधरा, राधा आणि विजय. मळके कपडे, चेहरे मळलेले. राधा आणि विजय यांचे कपडे हिरव्या रंगाचे. विजयचा बाकी मेकप अजयसारखा. )

वसुंधरा: मोहिते वरून खाली पडून वारले. राकेश विजयशी झालेल्या मारामारीत मेला. त्यांची गँग बरीचशी खतम झाली. उरलेल्यांना अटक झाली. अड्डा उद्‌ध्वस्त आणि लाखोंची मादक द्रव्यं जळून खाक झाली. सगळ्यांची सुखरूप सुटका झाली. सगळं नीट पार पडलं.

विजय: मी मुद्दाम अजयचा मेकप केला होता. आपण तर अजयला मारलं होतं आणि तोच कसा काय आपल्याला मारतोय हे शेवटपर्यंत राकेशला कळलं नाही. असा चकित झालेलाच मेला तो !

राधा: होय, त्याला कळतच नव्हतं काही !

वाघ: फक्त एक गोष्ट मात्र कायम माझ्या हृदयाला घरं पाडत राहील. नेहा ! विजयला मारलेली गोळी तिनं स्वत:वर घेतली !( पार्श्वसंगीत. ) माझी मुलगी ! ती अगदी मरताना, शेवटच्या क्षणी, वसुंधरानं तिला सांगितलं की हे -- म्हणजे मी -- तिचे डॅडी ! ती काय म्हणाली ठाऊक आहे, ' डॅडी, माझ्याकडून विजयला चुकीची माहिती दिली गेली. हॉटेल पद्मावर आज ते लोक नसतील, ही चुकीची माहिती दिली गेली माझ्याकडून –मी फसवली गेले ! ' जन्माला आल्यापासून अगदी शेवटी मरताना -- फक्त एकदाच -- ती मला ' डॅडी ' म्हणाली !

विजय : तुमची मुलगी ? पण मी म्हणतो सबंध आयुष्यभर जर तिला हे माहीतच नव्हतं तर अगदी शेवटी मरताना हे सांगून तिला कशाला गोंधळात पाडलं ?

वाघ: प्रत्येक गोष्ट पूर्ण व्हायला नको का ? काहीच अपुरं सोडलेलं प्रेक्षकांना आवडत नाही.

विजय: ती तुमची मुलगी कशी ?

वाघ: माझ्या आयुष्यातल्या एका मोठ्या चुकीतून जन्मलेली. माझ्यापासून या वसुंधराला लग्नाआधीच झालेली ! ती एक मोठी कहाणी आहे. नंतर सांगेन.

राधा: आता गोंधळात पडायची आमची पाळी आहे. पण डॅडी, ही गोष्ट तुम्ही कधीच बोलला नाहीत !

विजय: ठीक आहे. आधीच त्याना दु:ख झालेलं आहे. त्यामुळं आत्ता नको. आणि मुख्य म्हणजे आता पाचसात मिनिटांत हे संपवायचं आहे.

राधा: आयडिया कसली भन्नाट केली पण विजयनं !

वाघ: हं, ते काय केलं ? आमच्यापुढे त्यांनी चित्र तर असं उभं केलं होतं की तुम्ही तिथं पोचूच शकणार नाही ! त्याआधीच वाटेतच तुम्ही मृत्यू पावाल ! ( सौम्य पार्श्वसंगीत... )

विजय: सांगतो. नेहाकडून मला तिथलं वर्णन आधीच कळलेलं होतं. वर लोखंडी पाईपलाईनचं छप्पर आहे याचा मी फायदा घ्यायचं ठरवलं. त्यासाठी एका रसायनशास्त्रज्ञाला भेटलो. त्याच्याकडून एक असं ॲसिड मिळालं की ते समजा लोखंडावर टाकलं आणि नंतर त्याला पाणी लागलं तर ते लोखंडाला भोकं पाडतं. नंतर सेलवर चालणारी, फास्ट पळणारी अशी चाकांची आठदहा खेळणी घेतली. त्यांच्यावर दोनतीन छिद्रं असलेली ॲसिडपात्रं बसवली. त्यांना मागून गच्च हवा भरलेला एकेक रबरी फुगा जोडला. एवढी सामग्री आम्ही घेऊन गेलो. नेहा तिथं येऊ शकली नव्हती पण मला माहिती असल्यानं दरवाजा मीच उघडला. फुग्यांची हवा सैल करून ती खेळणी दोन्ही पाइपलाईन मार्गांतून सोडली. हवेच्या दाबानं वरच्या लोखंडावर ॲसिडचे थेंब उडत गेले. खेळणी सोडल्याबरोबर त्यांना कुणीतरी येत असल्याची सूचना मिळाली. पण येणारे लोक मध्यावर आल्यावर पाणी सोडायचं होतं. म्हणून एक मिनिट ते थांबले. तेवढ्या वेळात ही खेळणी शेवटपर्यंत ॲसिडचे थेंब उडवत गेली. नंतर त्यांनी जोरात पाणी सोडलं -- दोन्ही पाईपलाईन रस्त्यांमध्ये -- त्यामुळं ते पाणी लागून लोखंडाला भोकं पडली आणि दोन्ही बाजूंनी त्या दलदलीच्या भागावर जोरात कारंजे सुरू झाले. शिवाय त्या रस्त्यांच्या सुरुवातीच्या भागांवर आम्ही जास्त ॲसिड टाकून ठेवलं होतं. तिथं भगदाडंच पडली. त्यामुळं या कारंज्यांतून उडणारं पाणी आणि या भगदाडांतून बाहेर पडणारं फुसांडतं पाणी -- हे सगळं त्या दलदलीत जात राहिलं -- तिथं बरंचसं हिरवं गवत असल्यामुळं आम्ही हिरवे पोषाख घातले होते. हिरव्या मोटरबोटस् तयार ठेवल्या होत्या. पुरेसं पाणी मधल्या भागात साठल्यावर आम्ही मोटरबोटस् सुरू केल्या. कारंज्यांचं पाणी आणि गवताच्या रंगात मिसळणारा रंग यांमुळं आम्ही त्यांना दिसलो नाही. जवळ गेल्यावर मी पाहिलं -- त्यांच्या गँगमधला पहाऱ्यावर असलेला एक गुंड ती कारंजी पाहून हसत होता -- त्यामुळं चिडून मोहित्यानं त्याला लाथ घातली. तो वरनं खाली पडून मेला.

वाघ: असे तुम्ही सगळे तिथं पोचलात -- पुढं ?

विजय: एकदा तिथं पोचल्यावर प्रश्नच नव्हता ! अशा छप्पन्न गँग मी आत्तापर्यंत लोळवलेल्या आहेत !

वाघ: ग्रेट ! रिअली ग्रेट !

विजय: ( बाजूला -- मालवणी भाषेत -- ) असा केमिकल कुठं मिळता काय ते आमका ठाऊक नसां हां !

वाघ: हे एवढं सगळं पार पडेल असं वाटलं नव्हतं. आता काही प्रश्न नाही. सगळं टेन्शन गेलं. तुमच्या आई कुठं गेल्या ?

विजय: घरी जाऊन, अंघोळ, पूजा आटोपून, मंदिरात जाऊन, सगळ्यांना प्रसाद घेऊन मग ती इकडे येईल.

वाघ: ठीक आहे. योग्यच आहे ते. चला ! आज सावित्री असायला हवी होती !

वसुंधरा: ( अचानक -- ) थांबा ! ही स्टोरी इथं संपवायचा विचार दिसतोय तुमचा ! पण मी हे होऊ देणार नाही -- ( पार्श्वसंगीत. )

राधा: का ? काय झालं ?

वसुंधरा: अजून हे सगळं पूर्ण झालेलं नाही.

राधा: आता काय ? आपण पुढं आनंदानं जगत राहिलो असं समजायचं ! झालं !

वसुंधरा: माझी एक चूक मला सुधारायचीय.

विजय: लोक उठून चालायला सुरुवात करतात, त्या वेळी आता कसली चूक सुधारायचीय ? आता यात कुणाची कसली चूकबीक राहिलेली नाही. सगळे हिशोब जमलेले आहेत. सगळ्यांच्या मनांप्रमाणे सगळं झालेलं आहे. आता फार तर माझ्या न राधाच्या गाण्यातली एखादी ओळ रिपीट होऊ शकते. ( ओळ मोठ्या आवाजात घ्यावी... )

वसुंधरा: ( पर्समधून पिस्तूल काढते, वाघांवर रोखते -- ) थांबा ! कुणीही हलू नका -- मी गोळी झाडेन --

विजय: का पण, काय झालं काय ?

वसुंधरा: मला माझा स्वभाव बदलून वागायचंय. माझ्या आधीच्या स्वभावामुळं सगळं चुकलंय माझं --

राधा: काय चुकलंय ? मी तुला आई म्हणणार आहे.

वाघ: बोलू द्या तिला.

वसुंधरा: ( वाघांच्या दिशेने पिस्तूल रोखत -- ) यांनी -- यांनी वाटोळं केलं माझं आणि माझ्या मुलीच्या आयुष्याचं. स्वार्थासाठी. स्वत:ची प्रतिमा टिकवण्यासाठी.

विजय: हा विषय तुम्ही जरा आधीच काढायला हवा होता. आता कोण इंटरेस्ट घेणार याच्यात ?

वसुंधरा: माझा आत्तापर्यंतचा स्वभाव चुकलेला आहे. राधाचं सगळं नीट झालं हे चांगलं झालं. ती बिचारी निरपराध आहे. माझ्या स्वभावाची चूक मला उशिरा कळतेय तेच बरोबर आहे.

राधा: कसली चूक पण ?

वसुंधरा: मी यांना क्षमा का करावी ?

विजय: तुमचा चांगुलपणा पाहून बरं नाही का वाटणार सगळ्यांना ? तुम्ही तर एक शांत, समंजस, त्यागाची मूर्ती म्हणून लक्षात राहाल सगळ्यांच्या ! स्टोरीची डिमांड तीच आहे !

वसुंधरा: वाईट माणसांचा सूड तुम्ही घेतलात की नाही ? मग मी का घेऊ नये ?

विजय: तुमचाही उपयोग झालाच की ! त्या सूडाच्या प्रकारात !

वसुंधरा: ती वाईट माणसं वेगळी ! हे, हे म्हणतेय मी ! माझ्या आयुष्यातले वाईट !

विजय: अहो, पण आम्ही सगळी चांगली माणसं आहोत. तुम्ही असं केलंत तर दु:ख होईल आम्हाला. शेवट असा नका करू !

वसुंधरा: मी यांना क्षमा करणं चुकीचं आहे. मी यांचा सूड घेण्याची हीच योग्य वेळ आहे.

वाघ: मी जरा कुठं समाधानाचा सुस्कारा टाकतोय तर हे काय उपटलं ? यापुढं आपण एकत्र राहू ! काय प्रॉब्लेम काय आहे ?

वसुंधरा: वाईटाला शिक्षा व्हायला हवी की नको ?

विजय: अहो, पण या स्टोरीत डॅडींबद्दल इतका संताप कुणालाच येणं शक्य नाही. वेडेपणा होईल.

वसुंधरा: या प्रश्नाला महत्त्वच नव्हतं ना तुमच्या स्टोरीत ! पण यांच्या वाईट वागण्याची यांना शिक्षा व्हायला पाहिजे. यांची चूक झालीय की नाही ?

विजय: एक आता विचारतोच. राग मानू नका. यांची चूक -- यांची चूक -- असं जे तुम्ही मघापासून म्हणताय

ती चूक हे एकटे करू शकले असते का ? म्हणजे तुम्हीसुध्दा जबाबदार आहात ना याला ?

वसुंधरा: पण विश्वासघात तर त्यांनीच केलाय ना ! मी पूर्ण विश्वास टाकला होता. नुसती स्वत:ची प्रतिमा सांभाळत बसले ते !

विजय: पण आल्यावर शोध घेतला त्यांनी तुमचा. तुम्ही सापडला नाहीत. त्यावेळी त्यांच्या डोळ्यांत पाणीसुध्दा तरळलेलं दाखवलेलं आहे. वाईट वाटलं होतं त्यांना ! पटायला पाहिजे !

वसुंधरा: माझ्या बाबतीत त्यांची बिघडलेली प्रतिमा जरा दुरुस्त करून घ्यावी म्हणून फक्त तो शोध घेतल्याचा सीन घेतलाय. पण मूळ विश्वासघाताचं काय ? मी इतकी वर्षं दु:खात काढली त्याचं काय ? नेहाचं आयुष्य असं गेलं त्याचं काय ? याचा सूड घेतला जायला नको ?

विजय: अहो असं तर मग ज्याचा सूड घ्यायची गरज नाही असा एकही माणूस या जगात सापडणार नाही !

वसुंधरा: सूड घ्यावासा वाटत नसेल पुष्कळांना. किंवा संधी मिळत नसेल त्यांना. किंवा कमकुवतच असतील ते. त्यांची उदाहरणं मला नका देऊ. मला संधी मिळालेली आहे आणि क्षमा करण्याऐवजी मी सूड घेऊ इच्छिते ! इथं दाखवलेलं माझं कॅरॅक्टर मला पटलेलं नाही !

विजय: आम्ही दोघं बाहेर जाऊ का ? तुम्हा दोघांत काही समझोता झाला तर बघा.

वसुंधरा: नाही ! कुणीही, जागचं हलायचं नाही !

विजय: सगळ्यांचं जगणंच स्टोरी लेव्हलचं असतं हे लक्षात घेऊन तसाही आपण या गोष्टीला योग्य तो मोकळेपणा दिलेला आहे ! आता काय !

वाघ: मला माझ्या वागण्याचा सतत पश्चात्ताप होत आलेला आहे. व्यावहारिक यशाला मी सारखं महत्त्व दिलं -- माझी नैतिक बाजू लंगडी राहिली. हा गोंधळ का होतो हे मलाच कळलेलं नाही. मुळात मी एक भित्रा माणूस आहे बहुतेक. पण मी वेगळा कसा काय असू शकलो असतो ? मी स्टोरी मान्य करून चालतोय !

वसुंधरा: मग नेहमीच सगळ्यांचंच असंच असतं ! आपण जे आहोत तेच बरोबर समजणं ! आता मला सूड घ्यायचा स्वभाव ठेवावासा वाटतोय, तर मी तेच करणार !

विजय: कुठल्याही स्टोरीत अचानक, अनपेक्षित काही घडू शकतं. पण एखाद्या व्यक्तीनं स्वभाव बदलून घेणं धोकादायक आहे. हे असं चालत नाही. ठराविक स्वभावाच्या व्यक्ती असल्या म्हणजे स्टोरी पूर्ण होते. पिक्चरमध्ये आणि प्रत्यक्षातसुध्दा.

वसुंधरा: कुणी केले हे नियम ? सवयी नुसत्या !

विजय: तुमचं खरं धरलं तरीसुध्दा कृपया सूड घेऊ नका, अशी आमची तुम्हाला नम्र विनंती आहे.

वसुंधरा: मी सूड घेणारच !

वाघ: मी भित्रा माणूस आहे. मरणाला मी घाबरतो.

वसुंधरा: म्हणूनच मी तुम्हाला गोळी घालणार ! चांगलं-वाईट, बरोबर-चूक -- उडाणटप्पू गप्पा नुसत्या !

विजय: म्हणजे स्मगलर, खुनी लोकांना शिक्षा नको ?

वसुंधरा: स्वत: नीट राहण्यासाठी दुसऱ्यांचा विश्वासघात करणाऱ्यांना शिक्षा नको ?

विजय: हे पश्चात्तापदग्ध आहेत. यांना अशी शिक्षा केलेलं कुणालाच आवडणार नाही.

वसुंधरा: त्याचा काय प्रश्न येतो ? मी सूड घेणार ! ( वाघांना, जोरात --) प्रिन्सिपॉलसाहेब, मी आता गोळी झाडणार आहे. मरण्यापूर्वी तुम्ही शेवटचं एखादं वाक्य, बोलायचं असेल तर बोलू शकता. एकच वाक्य. ( शांतता. )

वाघ: मला मारू नकोस. ( पार्श्वसंगीत-तुकडा... )

वसुंधरा: खलास ! हेच तुमचं शेवटचं वाक्य ! ( त्यांच्यावर गोळी झाडण्यासाठी निर्धाराने खटका दाबते पण गोळी उडत नाही. )

विजय: ( स्मित करीत -- ) हे असं काही घडण्याची शक्यता मला वाटतच होती, त्यामुळं तुमच्या पिस्तूलातल्या गोळ्या मी आधीच काढून ठेवल्या होत्या ! ( खिशातून गोळ्या काढून दाखवतो. )

वसुंधरा: ( संतापून -- ) का ? असं का ? ( ते रिकामे पिस्तूल स्वत:च्या डोक्यावर तीनदा झाडते -- ) असं का ? असं का ? असं का ?

वाघ: ( वसुंधराच्या जवळ जात -- ) असं नको करूस वसुंधरा, ऐक माझं --

वसुंधरा: ( जवळजवळ वेड्याप्रमाणे त्यांच्यावर पिस्तूल रोखत -- ) थांबा ! ( रिकाम्या पिस्तूलालाही वाघ दचकतात. हात वर करत घाबरत मागे होतात. विजय अजून तळहातावर गोळ्या दाखवतो आहे. इथे हे दृश्य फ्रीज होते. अंधार होत पडदा पडत जातो... )

**समाप्त**

--- 000 ---

सूचना: सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. प्रयोगापूर्वी लेखी अनुमती घेणे आवश्यक आहे.

पत्ता: चं.प्र. देशपांडे,
३, स्नेहदीप अपा., चिंतामणीनगर, वीर सावरकर मार्ग, सहकारनगर नं.२,पर्वती, पुणे - ४११००९
दूरध्वनी : -- २४२२ ७८४७. / २४२२७८४८. / ९३७१००५७७३.